अस्सल सोलापुरी
# सुराज्य
सोलापूर
सोलापूर, पुणे, सांगली, उस्मानाबाद, लातूर, विजापूर, गुलबर्गा, बिदर, बीड
www.surajyadigital.com | शुक्रवार दि. ४ नोव्हेंबर २०२२ | वर्ष : २१ वे | अंक : ३८ वा किंमत : ५ रुपये | पाने ८



## श्वेतपत्रिकेचे ढोंग...

महाराष्ट्रात एखाद्या प्रकरणावर श्वेतपत्रिका काढण्याची हुक्की सत्ताधाऱ्यांना अधूनमधून येत असते. श्वेतपत्रिका निघणार म्हटल्यानंतर जनताही त्याकडे कान टवकारून पहात असते. पण अशा श्वेतपत्रिका म्हणजे बोलाचीच कढी,बोलाचाच भात अशातलाच प्रकार असतो. श्वेतपत्रिका काढली जाते पण, त्यावरच कुठलीच कार्यवाही होत नाही. केवळ चर्चेचे गुऱ्हाळच त्यात असते. फॉक्सकॉन-वेदान्त आणि टाटा-एअरबस प्रकल्प गुजरातमध्ये गेल्याने विरोधकांच्या टीकेला सामोरे जाव्या लागणाऱ्या शिंदे-फडणवीस सरकारकडून गुंतवणूक तसेच प्रकल्प बाहेर जाण्याच्या सद्यस्थितीबाबत श्वेतपत्रिका प्रसिद्ध करण्याची घोषणा केली गेली. राज्यात शिक्षण, ऊर्जा, वित्तीय परिस्थिती, सिंचन आदी विषयांवर आतापर्यंत श्वेतपत्रिका प्रसिद्ध करण्यात आल्या. त्यांचा वापर जुने राजकीय हिशेब चुकते करण्यासाठी हत्यार म्हणून सत्ताधाऱ्यांना निश्चितच झाला असला तरी कारभारात काहीच सुधारणा झाली नाही हे कटू सत्य आहे. सिंचनाच्या श्वेतपत्रिकेतून तत्कालीन मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण यांनी अजित पवार यांच्यावर कुरघोडी केली. दाभोळ प्रकल्पाच्या वादानंतर ऊर्जा विभागाच्या सद्यस्थितीबाबत श्वेतपत्रिका प्रसिद्ध झाली. तेव्हा तत्कालीन मुख्यमंत्री विलासराव देशमुख यांनी शरद पवार यांना टार्गेट केले होते. राज्यात सत्ताबदल झाल्यावर २००० आणि २०१५ मध्ये वित्त विभागाच्या श्वेतपत्रिका निघाल्या. दोन्ही वेळा आधीच्या सरकारांना दोष देण्याचा प्रयत्न जयंत पाटील व सुधीर मुनगंटीवार या तत्कालीन वित्तमंत्र्यांनी केला होता. एकूणच जुने राजकीय हिशेब श्वेतपत्रिकेतून चुकते करण्यात आले. सिंचनाचे क्षेत्र किती यातून श्वेतपत्रिका काढण्यात आली. पण सिंचनाखालील नक्की क्षेत्र किती याची आकडेवारीच गेली दहा वर्षे जाहीर झालेलीच नाही. १९७०च्या दशकात-मधुकरराव चौधरी शिक्षणमंत्री असताना त्यांनी राज्यातील शिक्षण व्यवस्थेचा आढावा घेणारी श्वेतपत्रिका प्रसिद्ध केली होती. १९९५ मध्ये शिवसेना-भाजप युती सरकार सत्तेत आल्यावर पाणी प्रश्नावर श्वेतपत्रिका प्रसिद्ध केली होती. पाण्याचा प्रश्न अजूनही सुटलेला नाही.१९९९ मध्ये काँग्रेस-राष्ट्रवादी आघाडीचे सरकार सत्तेत आल्यावर तत्कालीन अर्थमंत्री जयंत पाटील यांनी अर्थव्यवस्थेवर श्वेतपत्रिका प्रसिद्ध केली होती. त्यात त्यांनी कर्मचाऱ्यांच्या वेतनावरील खर्च कमी करणे आणि वित्तीय तूट कमी करण्याबरोबर शिस्त आणण्याचे आश्वासन दिले होते. वेतनावरील खर्च कमी होण्याऐवजी वाढतच गेला. वित्तीय तूटही वाढत गेली. २००२-०३ - दाभोळ वीज प्रकल्प बंद केल्यावर वीज टंचाईचा मुद्दा पुढे आला होता. तेव्हा शरद पवार यांना दाभोळवरून अडचणीत आणण्याची खेळी विलासराव देशमुख व काँग्रेसने केली होती. कुईकर चौकशी आयोग नेमण्यात आला. त्याच दरम्यान राज्यातील विजेच्या सद्यस्थितीवर श्वेतपत्रिका प्रसिद्ध करण्यात आली होती. ही श्वेतपत्रिका काढण्यासाठी राष्ट्रवादीने पुढाकार घेतला होता. काँग्रेस व राष्ट्रवादीच्या वादातून ही श्वेतपत्रिका काढण्यात आली होती. २०१२-सिंचन घोटाळ्याच्या आरोपांवरून राज्याचे राजकारण तापले होते. सुमारे ७० हजार कोटी खर्च करूनही सिंचन क्षेत्रात फक्त ०.१ टक्के वाढ झाल्याचा मुद्दा चर्चेत आला होता. तत्कालीन मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण यांनी राज्य सहकारी बँक आणि सिंचन घोटाळ्यावरून राष्ट्रवादीला अडचणीत आणले होते. तेव्हा सिंचनाची वस्तुस्थिती दर्शविणारी श्वेतपत्रिका प्रसिद्ध करण्यात आली होती. सुनील तटकरे हे जलसंपदा मंत्री असताना त्यांनी प्रसिद्ध केलेल्या श्वेतपत्रिकेत राज्यातील सिंचनाखालील क्षेत्र वाढल्याचा दावा केला होता. २०१५ - राज्यात सत्ताबदल झाल्यावर भाजप सरकारमधील वित्तमंत्री सुधीर मुनगंटीवार यांनी वित्तीय परिस्थितीबाबत ३५ पानी श्वेतपत्रिका प्रसिद्ध केली होती. त्यात वित्तीय सुधारणांसाठी कोणते उपाय योजणार, वित्तीय तूट कमी करणार वगैरे आश्वासने दिली होती. पण वित्तीय चित्र बदललेले नाही. श्वेतपत्रिका हा शब्द इंग्लंडमधून आला आहे. इंग्लंडच्या संसदेमध्ये एखादे नवीन विधेयक मांडायचे असेल तर त्या नवीन विधेयकासंदर्भातील सर्व कागदपत्रे, माहिती जनहितासाठी प्रसिद्धी केली जाते. ही माहिती दोन पद्धतीने प्रसिद्ध केली जाते. दुसरी अशी माहिती की विधेयकातील सखोल कामांची बारीक-सारिक माहिती दिली जाते. तसेच त्यामध्ये तपशिलात जाऊन माहिती घेतलेली असते. त्या संबंधाचा दस्तऐवज पांढऱ्या रंगाच्या फायलीत ठेवून संसदेपुढे सादर केला जातो. त्याला व्हाईट पेपर म्हणतात. तेव्हापासूनच एखादे विधेयक, एखाद्या खात्याच्या कारभाराची चौकशी करून संबंधित चौकशीचा दस्तऐवज पांढऱ्या फाईलमध्ये घालून सादर केला जातो त्याला श्वेतपत्रिका म्हणण्याची पद्धत रूढ झाली. श्वेतपत्रिकेवर चिंतन होण्याऐवजी त्या बासनात ठेवल्या जातात हीच राज्याची शोकांतिका आहे.



## मा. देवेंद्र फडणवीस, (उप) मुख्यमंत्री यांसी

**नमस्कार.**

महाराष्ट्रातील मुख्यमंत्र्यांचा इतिहास जर स्वतंत्रपणे लिहायचा ठरवला गेला, तर त्यात आपली विशेषत्वाने नोंद घेतली जाईल, याबाबत आमच्या मनात शंका नाही. आपण गुणसंपन्न आहात. यावर जेवढे भाष्य होईल, तेवढेच भाष्य आपल्यातील दोषांवरती सुद्धा होणार आहे. हे तुम्हीही नाकारणार नाहीत. कारण तुम्ही मोकळ्या मनाचे आहात. आज भारतीय जनता पक्ष आपला गैरवापर करून घेत आहे, अशी आमच्यासारख्या सामान्य मतदारांची समजूत झालेली आहे.

घराणेशाही आणि भ्रष्टाचाराच्या विरोधात भारतीय जनता पक्षाने कार्य उभे केलेले आहे. त्याला जनतेने पाठिंबाच दिलेला आहे. पण घराणेशाही म्हणजे नेमके काय याबाबत भाजपची गफलत होताना दिसते आहे. गांधी हे घराणे आहे आणि काँग्रेस पक्षावर त्यांचा पगडा आहे. हे सर्व मान्य आहे. कारण काँग्रेस पक्षाची स्थापना गांधी परिवाराने केलेली नाही. मुळात या कुटुंबाने धारण केलेले गांधी हे नाव हीच देशाची एक फसवणूक आहे आणि ते लोकांच्या नजरेत धूळफेक करण्यासाठी केले गेलेले आहे,

मात्र, ठाकरे हे घराणे आहे. अशा समजुतीत जर आपण असाल तर ती मोठी चूक करीत आहात. प्रबोधनकार ठाकरे आणि बाळासाहेब ठाकरे यांनी एक स्वतंत्र विचार महाराष्ट्राला आणि महाराष्ट्रातील तमाम जनतेला दिलेला आहे. संयुक्त महाराष्ट्रासाठी स्थापन झालेली समिती, उद्देशपूर्ती नंतर बरखास्त करण्यात आली. यानंतर महाराष्ट्रासाठी महाराष्ट्राचे असे स्वतःचे नेतृत्व नव्हते. बाळासाहेब ठाकरे यांच्या नेतृत्वाने ही उणीव भरून काढली. शिवसेना ही बाळासाहेबांच्या नेतृत्वाखाली स्थापन झालेली एक संघटना आहे. लोकशाहीच्या कार्यपद्धतीचा विचार करिता ती राजकीय पक्षात परावर्तित केली गेली आहे. सर्वसामान्य जनतेच्या मनात आजही शिवसेनेबद्दल तेवढेच प्रेम आहे जेवढे बाळासाहेब ठाकरे होते त्यावेळेसचे होते. ठाकरे हे घराणे म्हणून कार्यरत नव्हते व नाही. ते विचार आहेत. याची नोंद इतिहास घेईल. या संदर्भात भाजपच्या मनाचा मोठेपणा नाही.

खरे तर संपूर्ण देश भारतीय जनता पक्षाच्या नेतृत्वाखाली कार्यरत आहे. महाराष्ट्रासह (अडीच वर्षांचा अपवाद) अनेक राज्यात आपली राजकीय सत्ता आहे. पर्यायाने आपल्याच पक्षाचे नेतृत्व भारत भूमीच्या अनेक प्रदेशावरती कार्यरत आहे. काँग्रेसच्या विरोधात आम जनतेने आपल्या पक्षावरती मोठा विश्वास टाकलेला होता व आहे. तो विश्वास सर्वार्थाने सांभाळला जात आहे अशी आजची स्थिती दिसत नाही.



संपूर्ण देशाचे नेतृत्व भारतीय जनता पक्षाच्या हाती आहे. असे असताना मुंबई नगर महानगरपालिका आपल्याला येनकेन प्रकारेण ताब्यात घ्यायचीच आहे. या विचाराने पछाडलेल्या या पक्षाने ठाकरे कुटुंबीयांचे नाव पुढे करीत शिवसेनेवरती आघात सुरू केलेले आहेत. ते एक महाराष्ट्रातील मतदार म्हणून सर्वसामान्य जनतेला मान्य नाहीत. शिवसेनेत आपण उभी फूट पाडलीत. हो ही फूट भारतीय जनता पक्षानेच पाडलेली आहे. आपलाच पक्ष त्यासाठी तन, मन, धनाने सक्रिय राहिलेला आहे. हे तुम्ही कितीही नाकारत असला तरी सर्वसामान्य मतदारांची हीच समजूत आहे. ती चुकीचा आहे असे समजायचे कारण नाही. कायद्याच्या गप्पा मारत न्यायालयाच्या प्रक्रियेद्वारे आपण कितीही स्वतःला झाकून घेण्याचा प्रयत्न केलात तरी ते झाकले जाणारे नाही.

भारतीय जनता पक्षातील महाराष्ट्रातील राजकारण हे खुनशी वृत्तीचे, द्वेषाचे आणि तोडाफोडीचे झालेले आहे. आम जनतेला ते मान्य नाही. केंद्रीय तथा महाराष्ट्र राज्यातील गुप्तचर यंत्रणा आपले ताब्यात आहेत. या यंत्रणेमार्फत आपण याचा आढावा घेतलाच असेल. यातून आपल्याला हे समजेलच. असे काही नाही समजणार, असे मानणे सर्वसामान्य मतदारांच्या दृष्टीने हास्यास्पद असेल.

विरोधी राजकीय पक्षांच्यावतीने पत्रकार जे भाष्य करतात, त्यांना आपण HMV असे संबोधले आहे. आज बाळासाहेब असते तर भारतीय जनता पक्षाला पाठबळ देणारे, त्यांचे पाठीराखे आणि प्रसारमाध्यमे यांचे वर्णनही, त्यांनी क्वत च ठेवले असते. फक्त त्याचे विश्लेषण कशी Master's Voice असे अत्यंत खुबीने केले असते. बाळासाहेबांनी त्यांच्या नेमक्या निरीक्षणातून आणि व्यंगचित्रकाराच्या नजरेतून भारतीय जनता पक्षाला जे कमळाबाई हे नाव ठेवले आहे, ते सार्थ असल्याचे आज आपण महाराष्ट्रात करीत असलेल्या राजकारणातून स्पष्ट होते आहे.

आम जनतेचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे वरती प्रेम आहे. त्यांना पाठिंबा आहे. याचा अर्थ भारतीय जनता पक्षावरचे हे प्रेम आहे, असा समज करून घेत आपण चुकिच्या दिशेने चाललेले आहात. तुम्ही ज्या दिशेने चाललेले आहात, ज्या पद्धतीने भारतीय जनता पक्षाने महाराष्ट्रात माणसे गोळा केलेली आहेत, त्यांना पुढाकार देऊन बेताल वक्तव्य करण्यासाठी पाठबळ दिलेले आहे, हे सारे आपल्या पक्षाची प्रतिमा मलिन करणारे आहे. महाराष्ट्र नेतृत्वाबाबत दिवसेंदिवस पोरका होत चाललेला आहे, अशी काहीशी भावना जर सामान्य मतदारांच्या मनात निर्माण होत असेल तर त्यात त्यांचा काय दोष?

महाराष्ट्रपाठोपाठ सोलापूर शहरावरतीही भारतीय जनता पक्षाने मोठा अन्याय केलेला आहे. सोलापूरकरांनी आपणास आमदार दिले, खासदार दिले, नगरसेवक दिले. पण, 'सब घोडे बारा टक्के'. सोलापूर शहरातील आपली कार्यपद्धती ही काँग्रेस, राष्ट्रवादी काँग्रेसच्या पावलावर पाऊल टाकूनच आहे. अशीच आजची स्थिती आहे.

सोलापूर शहरासाठी आणि सोलापूरचे जनतेसाठी आपल्या पक्षाचे कोणीच काम करावयास तयार नाहीत. सोलापूरच्या होटगी रोडवरील विमानसेवेबाबत राजकीय पक्षांनी जो विचका करून ठेवलेला आहे, त्यात आपला भारतीय जनता पक्षही धडाडीने आघाडीवरती आहे हे आवर्जून सांगावे लागेल. शिवसेनेच्या विरोधातील आपली राजकीय भूमिका आम्ही समजू शकतो. पण ज्या पद्धतीने शिवसेना नेत्यांच्या व्यक्तिगत पातळीवरती आपला पक्ष उतरलेला आहे, त्याचा एक मतदार म्हणून आम्ही निषेधच करीत आहोत. कोणत्याही सबबीखाली आपली ही भूमिका समर्थनीय नाही. हे आपणास आवर्जून सांगावयाचे आहे. भारतीय जनता पक्षात असणारे आणि या पक्षाशी निगडित असणारे सगळे हौसे, नवसे आणि गवसे हे धुतल्या तांदळासारखे स्वच्छ आहेत, अशी आपली जी मनोवृत्ती आहे, ती हास्यास्पद आहे.

आपण सोलापूर जिल्ह्यात आज आहात. कार्तिकी एकादशीच्या निमित्ताने श्री विठ्ठलाची पूजा आपल्या हातून होईल. या निमित्ताने मनात काही विचार आले. ते मांडावेसे वाटले म्हणून या अनावृत्त पत्राद्वारे ते मांडलेले आहेत. तुमच्या पाठीराख्यांना हे आवडणारे नाहीत. याची आम्हांस कल्पना आहे. अर्थात त्यास आमचा नाइलाज आहे. असो. उगाच असे उपमुख्यमंत्री पदावर राहून महाराष्ट्राची दिशाभूल करू नका. रीतसर मुख्यमंत्री व्हा. एवढाच एक मतदार म्हणून सल्ला आहे. बाकी निवडणुकीतून तुमच्या आणि तुमच्या राजकीय पक्षाच्या भूमिकेबद्दल मतदार जे मत व्यक्त करतील, त्याचा स्वीकार सगळ्यांनाच करावा लागणार आहे. याबाबत कोणाच्या मनात शंका असावयाचे कारण नाही.

कळावे.

**आपला हितचिंतक**
**श्रीनिवास माधवराव वैद्य**
**चार्टर्ड अकाउंटंट, सोलापूर.**

टुडेज् ब्लॉग

## शेतकरी संघटनेचा ढाण्यावाघ गेला

इ. स. १९७८ तर ते १९८८ चा कार्यकाळ हा त्यांच्या वक्तृत्वशैलीने गाजल्यामुळे शेतकरी चळवळीला अतिशय बळकटी आली होती. शरद जोशी व माधवराव मोरे यांच्या नेतृत्वात रेलरोको, रस्ता रोको अशी अनेक आंदोलने नाशिक जिल्ह्यात व महाराष्ट्रात गाजली. त्यांच्या आंदोलनाची दखल बीबीसी सारख्या विख्यात परदेशी वृत्तसंस्थेने सुद्धा घेतली होती. तर शेतकरी आंदोलन चिरडण्यासाठी त्यावेळी सरकारकडून अश्रुधूर, लाठीमार व गोळीबार सुद्धा करण्यात आला होता. त्यामुळे तत्कालीन मुख्यमंत्री यांनी शरद जोशी, माधवराव खंडेराव मोरे व साखर संघाचे तत्कालीन अध्यक्ष माधवराव बोरस्ते व इतर नेत्याशी चर्चा करून आंदोलन मागे घेण्यासाठी प्रयत्न केले. आजचे शेतकरी संघटनेचे नेते रामचंद्र बापू पाटील, सुरेशचंद्र म्हात्रे सर, वामनराव चटप, रघुनाथदादा पाटील, राजू शेट्टी, शंकर धोंडगे, पाशा पटेल, अनिल गोटे, किशोर माथनकर, भास्करराव बोरावके, श्रीकांत तराळ, अरविंद नळकांडे, धनंजय पाटील काकडे, (अमरावती), नरेंद्र अहिरे, अमर हबीब, भगवान बोराडे, अनिल धनवट, सदाभाऊ खोत तसेच ज्येष्ठ महिला आघाडी सरोज ताई काशीकर, विमल काकू पाटील, आशाताई तरार, सुमनताई अग्रवाल, शैलाताई देशपांडे, ज्योतीताई खोंडे, सुहासिनी वानखडे, इत्यादी ज्येष्ठ कार्यकर्ते त्यांचे सहकारी होते. नानाचे धारदार भाषण हे आजही जनतेच्या नजरेसमोर तरळत राहते. त्या चळवळीतील पहिले खंबीर व प्रखर नेतृत्व म्हणून स्व. माधवराव खंडेराव मोरे (नाना) यांच्याकडे पाहिले जाते. शेतकऱ्यांचे बलस्थान व हृदयस्थान म्हणून शेतकरी संघटनेच्या आंदोलनात त्यांची ओळख होती. ज्या ज्येष्ठ कर्तुत्ववान नेत्यांनी शेतकरी चळवळीचे सूत्र सांभाळून, संपूर्ण महाराष्ट्राला जागे केले,

संपूर्ण महाराष्ट्रात शेतकरी संघटनेचा बालेकिल्ला म्हणून नाशिक जिल्हा ओळखला जात होता. पिंपळगाव बसवंत, जिल्हा नाशिक येथील माधवराव (नाना) खंडेराव मोरे यांची शेतकरी चळवळीतील अग्रणी नेते म्हणून महाराष्ट्रात त्यांची ओळख होती. शेतकरी चळवळ महाराष्ट्रात पसरविण्याचे काम स्व. शरद जोशी साहेबांच्या खांद्याला खांदा लावून त्यांनी केले. शेतमालाला उत्पादन खर्चानुसार भाव मिळाला पाहिजे, ऊस, कांदा प्रश्नावर व राज्यातील कापसाची प्रांत बंदी हटविण्यासाठी त्यांनी उर्वरित आयुष्य समर्पित केले. असा हा अग्रणी व प्रगल्भ वैचारिक नेता, वयाच्या ८८व्या वर्षी दि. २ नोव्हेंबर २०२२ ला संध्याकाळी ७ वाजून ४५ मिनिटांनी निघून गेल्याची वार्ता समजताच संपूर्ण महाराष्ट्रात शोककळा पसरली. त्यांच्या पश्चात पत्नी, दोन मुले विक्रम मोरे व विश्वास मोरे, सुना व नातवंडे असा परिवार आहे. त्यांच्या जाण्यामुळे शेतकरी चळवळीचे फार मोठे अतोनात नुकसान झाले. त्यांची वक्तृत्वशैली ही चळवळीच्या कार्यकर्त्यांसमोर निरंतर स्मरणात राहील.



तो ढाण्यावाघ निघून जाताच जनतेला अतोनात दुःख होऊन अश्रूचा बांध फुटला होता. माननीय स्व. शरद जोशींच्या नंतर शेतकरी चळवळीतील माधवराव खंडेराव मोरे यांना अग्रणी नेते म्हणून सर्व महाराष्ट्र डोळ्यांनी पाहत होता. त्यांच्या जाण्यामुळे एक महाराष्ट्रातील मुलुख मैदान तोफ जरी निघून गेली, असेल तरी त्यांनी हजारो कार्यकर्ते घडविले. महाराष्ट्र राज्य बलशाली होइल व भारत देशाला आर्थिक स्वातंत्र्य मिळवून देण्यासाठी त्यांचे मनोमन स्वप्न होते. ते स्वप्न पूर्ण करण्याची जबाबदारी त्यांनी हजारो कार्यकर्तेच्या खांद्यावर देऊन, त्यांनी जगाचा निरोप घेतला. त्यांचे अखेरचे भाषण पुणतांब्याच्या शेतकरी संपावरील कार्यक्रमात नाशिक येथे दि. ८ जून २०१७ मध्ये शेवटचे जाहीर भाषण झाले. त्यावेळेस त्यांनी आवर्जून सांगितले जगायचे असेल तर ताठ मानेने जगा. पक्ष, धर्म, जात, बाजूला टाका, सहन करणे आणि चमचेगिरी करणार सोडून द्या. एकदा तरी शेतकरी म्हणून सर्वजण एकत्र या. ही त्यांची कारकीर्द आयुष्यभर जनतेच्या स्मरणात राहील. शेतकरी योद्धाच्या अंत्यदर्शनासाठी महाराष्ट्रातून हजारो कार्यकर्ते पिंपळगाव बसवंत (जि. नाशिक) येथे गेले. शेतकरी संघटनेचे अनेक ज्येष्ठ नेते साश्रू नयनांनी निरोप देण्यासाठी व अंत्यविधीसाठी हजर झाले. त्यांच्या आत्म्यास सद्गती व शांती मिळो. शेतकरी संघटनेच्यावतीने भावपूर्ण श्रद्धांजली. अशा या थोर नेत्यास शेतकरी संघटना समन्वय समितीच्यावतीने आदरांजली व हीच प्रार्थना.

**धनंजय पाटील -काकडे, कार्याध्यक्ष, शेतकरी संघटना समन्वय समिती.**

बोधकथा

### नानकजींचा आशीर्वाद



गुरुनानकजी एकदा एका गावात गेले. गावकऱ्यांनी गुरुनानकजी यांना गावातून हाकलून दिले आणि त्यांचा अपमानही केला एवढे वाईट करूनही त्या गावकऱ्यांना आशीर्वाद दिला की ही एकता सदैव अशीच कायम राहो!

तिथून गुरुनानकजी दुसऱ्या गावात गेले. त्या गावातील गावकऱ्यांनी गुरुनानकजी यांचा खूप आदर सत्कार केला. प्रत्येक गावकरीने आपुलकीने विचारपूस केली तसेच गावात मुक्काम करण्याचा आग्रही धरला. नानकजी गावात थांबले आणि रात्रीला प्रवचन ही केला जोपर्यंत नानकजी थांबले तोपर्यंत त्यांची गावकऱ्यांनी खूप सेवा केली. शेवटी गावातून निरोप घेताना नानकजी आशीर्वाद रूपाने म्हणाले, 'तुमच्या गावाचा पूर्णपणे नाश होवो. तुमचं वाटोळे होवोत तुमच्यात भांडणे होवोत. आणि तुमची फुटाफूट होवो. हे ऐकून नानकजींचे सोबत असलेले शिष्य आश्चर्यचकित झाले आणि विचारायला लागले. आपण हा कसा आशीर्वाद या इतक्या चांगल्या गावकऱ्यांना दिलात? नानक हसत म्हणाले, 'तुम्ही प्रथम पहिले गावकरी आणि दुसरे गावकरी यातला अंतर लक्षात आणा. या दुसऱ्या गावातील प्रत्येक गावकरी हा एक सज्जन माणूस आहे. या सगळ्यांचे एकाच गावात काय काम आहे? जर भांडण झाले तुटातूट झाली तर हे गावकरी दुसऱ्या गावात जातील. असे झाल्याने ते सगळेच गांव सुधारतील! तसेच पहिल्या गावातील गावकरी हे त्याच गावात जितका वेळ सोबत राहतील ते चांगलेच आहे! गटाराचे पाणी एकाच ठिकाणी साठले तर चांगले परंतु गंगेचे सगळीकडे पसरायला पाहिजे. **तात्पर्य :- चांगल्याचा विस्तार होणे हेच जगाला सुखी करण्याचे रहस्य आहे.**

जन्म हा अखेरचा

### धर्माचारस्थल - २



तुमच्या वाणीतून कदाचित् अर्वाच्य शब्द बाहेर पडत नसतील, परंतु जर मनातल्या मनात तुम्ही कोणाचे अकल्याण चिंतत असाल तर तीदेखील हिंसाच आहे. पहिली शारीरिक हिंसा, दुसरी वाचिक हिंसा तर तिसरी मानसिक हिंसा होय. परमेश्वराने मनुष्याला शरीर, वाणी आणि मन ही जी त्रिकरणे दिली आहेत, ती शुद्ध झाल्याशिवाय मनुष्य परमात्म्यापर्यंत पोहोचू शकत नाही. म्हणून काया-वाचा-मनाने जो अहिंसाव्रताचे पालन करतो तोच मनुष्य खरा धार्मिक असतो. सामान्यतः मनुष्य जेंव्हा हिंसेसाठी प्रवृत्त होतो, तेंव्हा आपण काय करीत आहोत, याचे त्याला भान नसते. आपल्या हातून अधर्म घडतो आहे, याची त्याला जाणीव नसते. जेंव्हा त्याला अधर्माची स्पष्ट जाणीव होईल तेंव्हाच तो हिंसेपासून परावृत्त होईल.

भगवान गौतम बुद्धांच्या चरित्रात अंगुलीमालाची कथा आलेली आहे. त्याने नऊशे नव्याण्णव व्यक्तींची हत्या केली होती. एक हजार माणसांच्या करंगळ्या तोडून त्याची माळ तो देवीला अर्पण करणार होता. त्याला भेटलेला हजारावा मनुष्य गौतम बुद्ध होता. त्यांनी त्याला झाडाची पाने तोडायला सांगितले. त्याने बरीच पाने तोडून आणल्यावर गौतम बुद्धांनी परत झाडाला चिकटव असे सांगितले. पाने तोडता येतात परंतु, पुन्हा ती झाडाला चिकटवता येत नाहीत. असे अंगुलीमालाने म्हणाले. **(क्रमश:) – काशी जगद्गुरु डॉ. चंद्रशेखर शिवाचार्य महास्वामीजी.**

### सकारात्मक विचार जोपासा

जनमानस

अनेक समस्या असूनही त्यातून जमेल तसा मार्ग काढत जीवनाची वाटचाल सुरू आहे. अनेक गोष्टी व प्रश्न सर्वसामान्य लोकांच्या आवाक्याबाहेरचे आहेत. अश्या वेळी त्यावर चिंता करून काहीच उपयोग नसतो. आजूबाजूचे जग झपाट्याने बदलत असून हा वेग गाठताना सर्वसामान्य माणसांची दमछाक होत असताना आर्थिक अडचणी व महागाईने जीवनमान खालावत असताना येणारे सणवार मानसिक दिलासा देऊन जातात. परिस्थितीच्या प्रवाहाबरोबर वाहताना हे सकारात्मक विचार म्हणजे नैराश्याने बुडणार नाही याची हमी असते.



**- प्र. मु. काळे, नाशिक.**

## दातृत्वाची परंपरा...

ज्यांनी अनेक वर्षे वडिलार्जित काळी आई जतन केली. आपली शेती म्हणून आणि आपल्या उसाच्या हक्काचे साधन म्हणून मातीशी इमान राखले. मातीशी प्रामाणिक राहून अधिक चांगल्या कामगारांचा पीएफ असो अगर शेतकऱ्यांची एफआरपी असो; जो उसाला न्याय देईल, शेतकऱ्याला प्रतिष्ठा देईल, उसाला योग्य किंमत देईल त्याच्या गव्हाणीत ऊस टाकणे अधिक चांगले, असे ऊस उत्पादकांना वाटते. परंतु कमीअधिक प्रमाणात तालुक्यातल्या चारही कारखानदारांनी उसाला योग्य चांगला न्याय दिला आहे. अडचणींच्या काळात खतापासून बियाण्यांपर्यंत अधूनमधून मदत केली आहे. खरेतर चारही कारखान्यांनी मालक समाजसेवा राजकारणाला शेतकऱ्यांबद्दलची बांधिलकी या गोष्टी थोड्या वेळा बाजूला ठेवून कारखान्याचे चारही मालक पक्के व्यापारी असून सुशोभि धंद्यात कर्तबगार आहेत. फाटकातून आत येणारा ऊस कारखान्याच्या हिताचा किती? आपल्या मदत करणारी उसाची उपयोगिता किती? मळीचे काय होईल? इथपासून ते बगॅसपर्यंत हिशोब मांडणारे मालक अधिक मायाळू आहेत. या खाजगी आणि मालकी हक्काच्या स्पर्धेतून शेतकऱ्यांचे हित होईल, अशी भावना व्यक्त होताना दिसते.

गेल्या ऊस हंगामात फॅबटेक बंद होता. आज मोठ्या कष्टाने आमदारसाहेबांनी सुरू केला आहे. सांगोला साखर कारखाना गळीत हंगाम सुरू नव्हता. या वर्षी शेतकऱ्यांच्या सुदैवाने विठ्ठल सहकारी ताकदीने सुरू झाला आहे. शेतकऱ्यांच्या बांधावर पोहोचला आहे. इतर बिलं देण्यामध्येही पुढाकार घेतला आहे. तोडीस तोड म्हणून गळीत करत आला आहे. आता दामाजी साखर कारखाना अनेक अडचणींना तोंड देत मोठ्या कष्टाने १५०० ते २००० गळीत करणारा अधिक क्षमतेने ३५०० टनाच्या क्रशिंगवर पोहोचला आहे. दामाजी सहकारी आणि फॅबटेक यावर्षी गळिताचा उच्चांक करतील, अशी सध्याची परिस्थिती आहे. प्रचाराची किंवा वाहतुकीची मनधरणी करण्याबाबत कोणत्याच कारखान्याला गरज नसून जो दराचा उच्चांक देईल, शेतकऱ्याला अधिक चांगली वागणूक देईल; त्याच्या बाजूनेच शेतकरी उभे राहतील, अशी चोखोबा-दामाजीपंताची अपेक्षा आहे.



एकूणच शेतकरी ऊस उत्पादकांची भावना लक्षात घेऊन केंद्र सरकारने २५०० रुपयांची एफआरपी जाहीर केली आहे. एकंदरीत रिकव्हरीमध्ये थोडेफार खालीवर करण्याचा अधिकार शेती अधिकाऱ्याकडे उरला आहे. परंतु दर देताना २५०० रुपयांची एफआरपीपेक्षा १००-२०० दर अधिक द्यावा लागेल; असेच सध्याचे वातावरण आहे. याबाबतीत जरा साखर उपायुक्त सोलापूरचे कार्यालय झोपेतून जागे झाले; तर शेतकऱ्याला अधिक न्याय मिळेल असेच सध्याचे वातावरण आहे.

ऊसतोड टोळ्यांपासून हॉर्वेस्टींग व्यवस्था नीट लावण्यामध्ये अर्थात तोडचिठ्ठी देण्यामध्ये जो चीटबॉय माणुसकी दाखवेल, शेतकऱ्यांशी नीट वागेल, अरेरावीबद्दल संयम पाळेल तोच कारखाना साखर धंद्यात यशस्वी होईल, असे वाटते. पाचवा कारखाना म्हणून सिताराम महाराजांचे आशीर्वाद पाठीशी आहेतच. गुंजेगांव, दहिवडी, लेंडवेचिंचाळे, शिरशीपर्यंत. गोणेवाडीपासून घेरडीपर्यंत सिताराम महाराजांचा आधार आहे. धनश्रीच्या सभासदांकडून अधिक शक्ती मिळेल, धनश्रीचे सभासद सिताराम साखर कारखान्याला मदत करतील, अशी अपेक्षा आहे. चांगले व्यवस्थापन म्हणून लौकिक असलेला युटोपियन प्रशासनात उत्तमरितीची छाप पाडेल आणि गळीत हंगामात कोण पुढे जाणार याचा निकाल महिनाभरात लागेल. परंतु रांगेत युटोपीयनला जास्त वेळ थांबावे लागते. याबाबत चेअरमन काळजी घेतली, अशी अपेक्षा आहे. दहा रुपये किलो प्रमाणे साखर पोहोच करणारा दामाजी असो अगर साखर कारखान्यांना धान्याची कोठारं मोकळी करणाऱ्या इतिहासाची परंपरा राखणारा दामाजी काळजीपूर्वक पावलं टाकतोय परंतु कुणी पंचवीस रुपये किलोने तर कुणी तीस रुपये किलोने साखर घेण्याचा रिवाज मात्र कायम राखला आहे. तोडीस तोड म्हणून सर्वच साखर कारखान्यांनी वीस ते तीस रुपये किलोने साखर देऊन माणुसकी जपली असून गरिबांची दिवाळी साजरी करण्यात मदत केली आहे. दातृत्वाची परंपरा कायम राखली आहे. शेतीला समृद्ध करण्यासाठी रास्त भावात बगॅस वाटपाची परंपरा काही जणांनी चालू ठेवली आहे.

**- प्रा. लक्ष्मण ढोबळे, माजी मंत्री, प्रांतिक सदस्य, भाजप.**

सुराज्य सोलापूर हे दैनिक मुद्रक, प्रकाशक राकेश हरिपंत टोळये यांनी सह्याद्री पब्लिशर्स, १५७/१५८, औद्योगिक वसाहत, होटगी रोड, सोलापूर येथे छापून तेथे आणि ६०६/७/८, नारायण पेठ, पुणे-३० येथून एकाचवेळी प्रकाशित केले. सोलापूर मुख्य कार्यालय - फोन-०२१७-२६०७२०१, फॅक्स-०२१७-२६०७२०२, पुणे शहर कार्यालय - फोन/फॅक्स - ०२०-२४४६४७५५. I R. N. I. NO. MAHMAR / २००२/९७०७/२००३ I Email - dailysuraajya@gmail. com संस्थापक - स्व. राजेश विष्णूपंत कोठे, संपादक - राकेश टोळये.






अस्सल सोलापुरी

# सुराज्य

सोलापूर

सोलापूर, पुणे, सांगली, उस्मानाबाद, लातूर, विजापूर, गुलबर्गा, बिदर, बीड

www.surajyadigital.com | शुक्रवार दि. ४ नोव्हेंबर २०२२ | ▸ वर्ष : २१ वे ▸ अंक : ३८ वा किंमत : ५ रुपये ▸ पाने ८


## गुजरातमध्ये दोन टप्प्यात निवडणूक; १ आणि ५ डिसेंबर रोजी मतदान

**नवी दिल्ली** : केंद्रीय निवडणूक आयोगाने गुजरात विधानसभा निवडणुकीची घोषणा केली आहे. गुजरातमध्ये दोन टप्प्यात निवडणूक होणार असून १ आणि ५ डिसेंबर रोजी दिवशी मतदान होणार आहे. मतमोजणी ८ डिसेंबर रोजी होणार आहे. ४.९ कोटी मतदार गुजरातमधील नव्या सरकारसाठी मतदान करणार आहेत. गुजरात विधानसभेत १८२ जागा आहेत. पहिल्या टप्प्यात ८९ आणि दुसऱ्या टप्प्यात ९३ जागांवर निवडणूक होणार आहेत. मोदी, शाह यांचे गृहराज्य असल्याने या निवडणुकीकडे देशाचे लक्ष लागले आहे. केंद्रीय निवडणूक आयोगाने पत्रकार परिषद घेत गुजरात विधानसभेची निवडणूक जाहीर केली आहे. ५० टक्के मतदान केंद्राचे थेट प्रसारण करण्यात येणार असल्याची माहिती आयोगाने दिली.

### ▪ पंढरपूर तीर्थक्षेत्र विकास आराखड्याबाबत उपमुख्यमंत्री फडणवीसांची घोषणा

# निकषाच्या बाहेर जाऊन बाधितांचे पुनर्वसन करणार

सुराज्य/पंढरपूर

**पंढरपूर तीर्थक्षेत्र विकासासाठी अप्रतिम आराखडा करू या. आहे त्यापेक्षा अधिकच्या सुविधा नागरिकांना उपलब्ध व्हाव्यात. चांगल्या दर्जाचे रस्ते तयार करावेत. मंदिर व मंदिर परिसराचा विकास करताना बाधित होणाऱ्या ऐतिहासिक, पुरातन मूळ वास्तुंचे अभियांत्रिकीतील आधुनिक तंत्रज्ञानाद्वारे जतन करावे, अशा सूचना करून उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी भूसंपादन करताना, निकषाच्या बाहेर जाऊन बाधितांचे पुनर्वसन करण्याची ग्वाही आज येथे दिली.**

पंढरपूर तीर्थक्षेत्र विकास आराखडा बैठकीच्या अध्यक्षस्थानावरून ते बोलत होते. शासकीय विश्रामगृह, पंढरपूर येथे झालेल्या या बैठकीस महसूलमंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री राधाकृष्ण विखे-पाटील, खासदार रणजितसिंह नाईक निंबाळकर, खासदार डॉ. जयसिद्धेश्वर महास्वामी, आमदार सर्वश्री रणजितसिंह मोहिते पाटील, समाधान आवताडे, बबनराव शिंदे, राम सातपुते, शहाजीबापू पाटील, सुभाष देशमुख, माजी आमदार प्रशांत परिचारक, विभागीय आयुक्त सौरभ राव, जिल्हाधिकारी मिलिंद शंभरकर, कोल्हापूर परिक्षेत्राचे पोलीस महानिरीक्षक मनोज लोहिया, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी दिलीप स्वामी, पोलीस अधीक्षक शिरीष सरदेशपांडे, मंदिर समिती सहअध्यक्ष गहिनीनाथ महाराज औसेकर, प्रांताधिकारी गजानन गुरव आदि उपस्थित होते.

भूसंपादनासाठी आवश्यक जमिनीची मोजणी करून प्रस्ताव तयार करावा. भूसंपादन लवकरात लवकर होण्यासाठी प्रयत्न करावेत, अशा सूचना करून उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले, स्थानिकांचे पुनर्वसन करताना ज्यांचा व्यवसाय आहे, त्यांना तिथेच प्राधान्याने जागा देऊ. रहिवाशांना बहुमजली इमारतीत घरे आणि मोकळा प्लॉट किंवा भरीव नुकसान भरपाई देण्याचा विचार करण्यात येईल. मात्र स्थानिक लोकप्रतिनिधींनी नागरिकांशी चर्चा करून पंढरपूरचा चांगला विकास करण्यासाठी सुवर्ण मध्य साधावा, असे ते म्हणाले.



पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील म्हणाले, पंढरपुरात येणाऱ्या भाविक व स्थानिक नागरिकांना आवश्यक व दर्जेदार सोयी सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी पंढरपूर तीर्थक्षेत्र विकास आराखड्यांतर्गत नवीन समाविष्ट कामांना गती द्यावी. स्वच्छ व मुबलक पाणीपुरवठा, सांडपाणी व घनकचरा व्यवस्थापन, रस्ते आदि बाबींचा विचार करावा, अशा सूचना त्यांनी यावेळी केल्या. प्रास्ताविकात पुणे विभागीय आयुक्त सौरभ राव यांनी तीर्थक्षेत्र विकास आराखडा अंतर्गत आतापर्यंत केलेल्या कार्यवाहीचा तपशील सादर केला. आराखडा सर्वसमावेशक करण्यासाठी वाराणसी कॉरिडॉर विकास योजनेच्या धर्तीवर पंढरपूर तीर्थक्षेत्र विकास आराखडा करण्यात आल्याचे सांगितले. प्रारूप तीर्थक्षेत्र विकास आराखडा तयार करण्यापूर्वी सर्व संबंधितांसोबत तसेच वरिष्ठ अधिकाऱ्यांसोबत बैठका घेण्यात आल्याचे सांगितले. हरकती व सूचनांचाही विचार करण्यात आला. आराखडा तयार करताना त्रृटी राहू नयेत, यासाठी स्थानिक लोकप्रतिनिधी, तज्ज्ञ, नागरिक, व्यापारी व वारकरी संप्रदाय पदाधिकाऱ्यांच्या आवश्यक सूचनांचा समावेश आराखड्यात करण्यात आल्याचे सांगितले. तसेच केंद्र शासकिय योजनेमध्ये चंद्रभागा नदीचा समावेश केल्यास आर्थिक व तांत्रिक मदत मिळेल, असे ते म्हणाले.

जिल्हाधिकारी मिलिंद शंभरकर यांनी सादरीकरणात विठ्ठल रूक्मिणी मंदिर व परिसरात करावयाच्या पायाभूत सुविधांचा तपशील दिला.

## शेतकऱ्यास १२ लाखास गंडवणाऱ्या, बीडच्या कामगाराविरुद्ध गुन्हा

**सोलापूर** : आपण ऊसतोड कामगाराचे मुकादम आहोत. तुमच्या शेतातील ऊस तोडीसाठी मजूर पुरवितो. अशी थाप मारून बीडच्या दोघा भामट्यांनी शेतकऱ्यास १२ लाखास गंडविले.

ही घटना कुंभेज (ता.माढा) येथे घडली.या प्रकरणात माढ्याच्या पोलिसांनी माणिक भगवान थोरात आणि संतोष थोरात (दोघे रा. लिंबागणेश जि.बीड) या दोघांविरुद्ध फसवणुकीचा गुन्हा दाखल केला. यासंदर्भात सोमनाथ सरवदे (रा. कुंभेज ता.माढा) यांनी फिर्याद दाखल केली. थोरात यांनी ऊस तोडीचे मजूर पुरवतो म्हणून माढा येथील वकिलाच्या कार्यालयात त्यांच्याकडून बारा लाख रुपये घेतले होते. मात्र त्याने वेळेत मजूर पुरवले नाही किंवा पैसे देखील परत केले नाही. शिवाय त्या दोघांनी गावातील सचिन सरवदे आणि शिरीष गलांडे यांना देखील अशीच फसवणूक केली. असे त्यांच्या फिर्यादीत नमूद आहे. हवालदार दराडे पुढील तपास करीत आहेत.






## धाब्यावर छापा; मद्यपींसह हॉटेल चालकावर गुन्हा

सुराज्य/सोलापूर

राज्य उत्पादन शुल्क सोलापूर यांनी मिळालेल्या बातमीच्या दि.२ नोव्हेंबर रोजी हैद्राबाद रोडवरील परिसरातील हॉटेल मिलन येथे छापा टाकून हॉटेलचे चालक याचेसह हॉटेलमध्ये अवैधरीत्या दारू पिण्याकरिता बसलेल्या ५ मद्यपी व हॉटेल चालकास ताब्यात घेऊन त्यांच्यावर गुन्हा दाखल केला.तसेच न्यायालयाने ५० हजाराचा दंड ठोठावला.

ताब्यात घेण्यात आलेल्या संशयित आरोपींच्या ताब्यातून १ हजार ५५ रुपयेचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.सर्व संशयित आरोपीविरुद्ध महाराष्ट्र दारूबंदी कायदा नुसार गुन्हा दाखल करून दि.३ नोव्हेंबर रोजी न्यायालयात दाखल केले असता दारूबंदी न्यायालय,सोलापूर यांनी तात्काळ निकाल देत हॉटेल चालकास २५ हजार रुपये व मद्यपी ग्राहकांना प्रत्येकी ५ हजार रुपये प्रमाणे असा ५० हजार रुपये दंड ठोठावला आहे.

## पाकिस्तानचे माजी पंतप्रधान इम्रान खान यांच्यावर गोळीबार

**कराची** : पाकिस्तानचे माजी पंतप्रधान इम्रान खान यांच्यावर गुजरानवाला या ठिकाणच्या रॅलीमध्ये गोळीबार झाल्याची घटना घडली आहे. या गोळीबारात इम्रान खान यांच्या पायाला जखम झाल्याची माहिती आहे. यानंतर इम्रान खान यांना तातडीने लाहोरच्या रुग्णालयात हलवण्यात आलं आहे. इम्रान खान यांच्यासोबतच्या एकाचा मृत्यू झाला आहे.



सात जण जखमी झाल्याची माहिती समोर येत आहे. हल्लेखोरांपैकी एकाला ताब्यात घेण्यात आलं आहे. इम्रान खान यांच्यावर चार ते पाच हल्लेखोरांनी गोळीबार केल्याचं समोर आलं असून त्यापैकी एका आरोपीला अटक करण्यात आली आहे. इम्रान खान यांच्यावर झालेल्या या गोळीबारानंतर केवळ पाकिस्तानच नव्हे तर जग हादरलं आहे. पाकिस्तान सध्या राजकीय आणि आर्थिक अस्थिरतेतून जात असून या देशात सध्या अनागोंदीच्या वातावरणातून जात आहे. या आधी पाकिस्तानच्या माजी पंतप्रधान बेनिझिर भुट्टो यांच्यावर गोळीबार करण्यात आली होती. त्यामध्ये बेनिझिर भुट्टो यांचा मृत्यू झाला होता.

त्यानंतर इम्रान खान यांच्यावर हल्ला होऊ शकतो अशी शक्यता या आधीच अनेकांनी व्यक्त केली होती. आता ती शक्यता सत्यात आली असून पाकिस्तानची स्थिती सध्या चिंताजनक बनली आहे.






## पाकिस्तानचे स्पर्धेतील स्थान कायम

**मेलबर्न** : विश्वचषक स्पर्धेत पाकिस्ताननं नुकताच दक्षिण आफ्रिका संघावर ३३ धावांनी विजय मिळवला. पावसाच्या व्यत्ययामुळं पाकिस्ताननं आफ्रिकेला दिलेलं १८५ धावाचं टार्गेट १४२ करण्यात आलं आणि ओव्हर्स १४ करण्यात आले. अखेर आफ्रिकेचा संघ १०८ धावाच करु शकल्याने पाकिस्तान विजयी झाला.






## तिसरा डोळा


– प्रकाश पोरे



आम्ही किरकोळ कामं करत नसतो!!

| कल्याण |
| --- |
| ------- |

| मेन बाजार |
| --- |
| ------- |



## शेतकऱ्यांच्या खात्यात निधी त्वरित जमा करा : पवार

**सुराज्य/उत्तर सोलापूर :** परतीच्या पावसाने उत्तर तालुक्यातील शेतकऱ्यांचे आर्थिक नुकसान झाले असून बळीराजा अडचणींत सापडला आहे. राज्यातून मदत जमा झाली असा संदेश प्रसारित होत असून प्रत्येक्षात मात्र खाते रिकामे असल्याचे निर्दशनस दिसून आले तेंव्हा नाराजीचा सूर उमटत आहे. शेतकऱयांची दिशाभूल केली जात असून हेळसांड थांबविण्यासाठी त्वरित नुकसान भरपाई जमा करावी अश्यां मागणींचे निवेदन उत्तर तहसीलदार जयवंत पाटील ह्यना राष्ट्रवादी युवक काँग्रेसचे उत्तर तालुकाध्यक्ष बालाजी पवार यांनी दिले आहे. जिल्ह्यासह उत्तर सोलापूर तालुक्यातील शेतकऱ्यांच्या पिकांचे खूप मोठ्या प्रमाणात नुकसान झालेले आहे. सरकार ने मदत रक्कम जाहीर केल्याप्रमाणे शेतकऱ्यांच्या खात्यात अद्यापपर्यंत नुकसानीची रक्कम जमा न झाल्याने शेतकरी आर्थिक अडचणीत सापडला आहे. येत्या आठवड्यात शेतकऱ्यांच्या खात्यात रक्कम जमा करण्यात यावी अन्यथा पुढील आठवड्यामध्ये राष्ट्रवादी युवक काँग्रेस व शेतकरी यांच्या वतीने जिल्हा परिषद सोलापूर कार्यालयासमोर तीव्र आंदोलन करण्यात येईल याची नोंद घेण्यात यावी. यावेळी नंदकुमार गरड, संजय लंबे, सुयोग होणमुटे, शुभम शिंदे यांची उपस्थिती होती.

## कोळेगाव तंटामुक्त समितीच्या अध्यक्षपदी डॉ. जाधव

**सुराज्य/पिलीव :** कोळेगाव (ता. माळशिरस) येथील महात्मा गांधी तंटामुक्त गांव समितीच्या अध्यक्ष पदी डॉ. आनंदराव शंकरराव जाधव यांची फेरनिवड करण्यात आली. ग्रामसभेच्या अध्यक्ष स्थानी सरपंच प्रमिला दुपडे होत्या. यावेळी तंटामुक्त मुक्त अध्यक्ष पदासाठी सर्व ग्रामस्थाच्या वतीने पुन्हा डॉ. आनंदराव जाधव यांची बिनविरोध निवड करण्यात आली. यावेळी माजी उपसरपंच धनंजय दुपडे, आदिकराव सावंत, विविध सेवा संस्थेचे माजी अध्यक्ष बाबासाहेब सावंत, विविध सेवा संस्थेचे अध्यक्ष शहाजी सावंत, माजी उपसरपंच नागण्णाथ दुपडे, अँड धनंजय दुपडे, नवनाथ सावंत, प्रसाद दुपडे, आबासो दुपडे, धनंजय सावंत, दत्तात्रय सावंत, उतरेश्वर पारसे, दादासो दुपडे, गणेश निंबाळकर, विजय दुपडे, विजय चव्हाण, , माजी चेअरमन बाबासो दुपडे, कैलास दुपडे, आण्णासो दुपडे, गोपाळ दुपडे. विविध शाखेचे पदाधिकारी, ग्रामस्थ उपस्थित होते.



## प्राध्यापक, कर्मचाऱ्यांचे थकीत वेतन त्वरीत वितरीत करा

**उपमुख्यमंत्री फडणवीस यांनी अधिकाऱ्यांना दिल्या सूचना**

**सुराज्य/सोलापूर :** पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ आणि गोंडवाना विद्यापीठातील प्राध्यापक व कर्मचाऱ्यांचे वेतन थकले आहे. वेतन थकू नये यासाठी उपाययोजना आखाव्यात, तसेच थकीत वेतन तातडीने वितरित करण्यात यावे, अशा सूचना उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी अधिकाऱ्यांना दिल्या. मुंबई मध्ये मंगळवारी सोलापूर विद्यापीठासह राज्यातील विद्यापीठांच्या प्रश्नांबाबत बैठक झाली. यावेळी या सूचना देण्यात आल्या. या बैठकीस उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी उप मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, शारिरिक शिक्षण संचालक, ग्रंथपाल व प्रयोगशाळा सहायक ही पदे भरण्यासंदर्भातील कार्यवाही गतीने करा. शासनमान्य सार्वजनिक ग्रंथालयांच्या प्रलंबित अनुदान दरात ६० टक्के वाढ करा, अशा सूचना यावेळी उपमुख्यमंत्री फडणवीस यांनी दिल्या. तसेच डॉ. पंजाबराव देशमुख वसतिगृह निर्वाह भत्ता योजनेंतर्गत विद्यार्थ्यांना निर्वाह भत्त्यात वाढ करणे, राज्यातील विधी विद्यापीठाच्या बांधकाम व दुरूस्तीसाठी निधी उपलब्ध करून देण्यात येईल असेही उपमुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले. या बैठकीस उच्च व तंत्रशिक्षण विभागाचे प्रधान सचिव विकासचंद्र रस्तोगी, नियोजन विभागाचे प्रधान सचिव नितीन गद्रे, वित्त विभागाचे प्रधान सचिव ओ. पी. गुप्ता, वस्त्रोद्योग विभागाचे प्रधान सचिव पराग जैन, उच्च शिक्षण संचालक धनराज माने, तंत्र शिक्षण संचालक अभय वाघ उपस्थित होते.


## निधन वृत्त

### कृष्णाबाई लेंगरे



**सुराज्य/पिलीव :** पिलीव (ता. माळशिरस) येथील रहिवासी कृष्णाबाई ज्ञानु लेंगरे (वय ९०) यांचे अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांच्या पश्चात दोन मुले, तिन मुली, सुना, नातवंडे असा परिवार आहे. त्या पंढरीनाथ लेंगरे गुरुजी यांच्या मातोश्री होत.

### अर्जुन इनामदार




**सुराज्य/उत्तर सोलापूर :** उत्तर सोलापूर तालुक्यातील मार्डी येथील रहिवासी अर्जुन संभु इनामदार (वय ८२) यांचे निधन झाले. त्यांच्या पश्चात पत्नी, दोन मुले, तीन मुली, सूना, जावई व नातवंडे असा परिवार आहे.

### किरण हानवते



**सुराज्य/कुर्डूवाडी :** कुर्डूवाडी येथील रहिवासी किरण किसन हनवते (वय २७) यांचे अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांच्या पश्चात आई, वडील, भाऊ, वहिनी, पुतण्या असा परिवार आहे. माजी नगरसेवक किसन हनवते यांचे ते चिरंजीव होत.

### सिध्दाराम जेऊरे



**सुराज्य/सोलापूर :** रेल्वे लाईन जयकुमार अपार्टमेंट सोलापूर येथील रहिवासी सिध्दाराम म. जेऊरे (वय ७२) यांचे अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांच्या पश्चात पत्नी, मुलगा, मुलगी, सून, नातवंडे असा परिवार आहे.

# कुरघोडी, ओढीओढी, फडणवीसांसमोर होणार झाडाझडी

## परिचारक-अवताडे; परिचारक-महाडिक यांच्यात होणार का समेट?

**सुराज्य/पंढरपूर**



उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हे कार्तिकी एकादशीनिमित्त पंढरपूर दौऱ्यावर येणार आहेत. उपमुख्यमंत्री झाल्यानंतर देवेंद्र फडणवीस यांचा सोलापूर जिल्ह्याचा पहिलाच दौरा. देवेंद्र फडणवीस यांच्यावर सोलापूर जिल्ह्याचे पालकत्वाची ही जबाबदारी आहे, असे असताना माजी आमदार प्रशांत परिचारक आणि आमदार समाधान आवताडे यांच्या दामाजी साखर कारखान्यावरून अंतर्गत कलह निर्माण झाला आहे. तसेच, भीमा कारखानाच्या निवडणुकींवरून ही खासदार धनंजय महाडिक यांच्या विरोधात माजी आमदार प्रशांत परिचारक यांचे समर्थक उभे टाकले आहेत. महाडिक आणि परिचारक यांच्यात जुना संघर्ष आहे. त्यामुळे पंढरपूर दौऱ्यावर देवेंद्र फडणवीस आल्यानंतर या सर्वांना एकत्र आणण्याची भूमिका त्यांना घ्यावी लागणार आहे.

विधानसभा पोट निवडणुकीमध्ये समाधान आवताडे यांना सहकार्य करणारे माजी आमदार प्रशांत परिचारक यांनी श्री संत दामाजी सहकारी साखर कारखान्यामध्ये आमदार समाधान आवताडे यांना चांगलाच हिसका दाखवला आहे. भाजप शहराध्यक्ष आणि राष्ट्रवादीला सोबत घेऊन भाजप आमदाराविरुध्द निवडणूक लढून त्यांना पराभूत करण्याचे काम परिचारक समर्थकांनी केले आहे.

दामाजी करखाण्याच्या निवडणुकीनंतर आमदार समाधान आवताडे आणि माजी आमदार प्रशांत परिचारक यांच्यात विंचुष्ट आले आहे. महाविकास आघाडीचे सरकार असताना आमदार समाधान आवताडे यांनी देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वावर विश्वास ठेवून काम केले आहे. त्यांनी पक्षाशी एकनिष्ठता दाखवली आहे. भाजपच्या कार्यक्रम, बैठकांना त्यांची उपस्थिती आहे. मात्र त्याच वेळी प्रशांत परिचारक परिचारक यांनी आपले काँग्रेस - राष्ट्रवादी काँग्रेस मधील जुने सहकाऱ्यांच्या गाठीभेटी घेऊन जवळीकता साधली होती. महाराष्ट्रात सत्तांतर झाल्यानंतर आमदार समाधान आवताडे यांना देवेंद्र फडणवीस यांनी जवळ केले असून पंढरपूर मंगळवेढा मतदारसंघातील अनेक प्रश्न गेल्या चार महिन्यात सोडवण्यात आमदार समाधान आवताडे यांना मिळाला आहे. मंगळवेढ्याच्या उपसा सिंचनाचा प्रश्न, पंढरपूर एमआयडीसी, नदींवरील बंधाऱ्याची उंची वाढवणे इत्यादी महत्त्वाच्या प्रश्न देवेंद्र फडणवीस यांनी मार्गी लावले आहेत.

पक्षांतर्गत कलहामुळे आमदार समाधान आवताडे यांना पंढपुरात काम करताना अडचणी येत आहेत. बहुप्रतिक्षित असलेल्या एमआयडीसीचा प्रश्न आमदार अवताडे मार्गी लावत असताना परिचारक समर्थकांनी त्याला विरोध दर्शवला आहे. त्यामुळे एमआयडीसीचा विषय पुन्हा प्रलंबित पडला आहे.

देवेंद्र फडणवीस पंढरपूर दौऱ्यावर आल्यानंतर त्यांना परिचारक - अवताडे, परिचारक - महाडिक यांच्यातील वाद मिटवावा लागणार आहे. भाजपाला सोलापूर जिल्ह्यात विस्तारण्यासाठी अंतर्गत कलह मिटवावे लागणार आहेत

भीमा सहकारी साखर कारखान्यामध्ये भाजप खासदार धनंजय महाडिक यांच्याविरुध्द राष्ट्रवादीचे राजन पाटील यांना सोबत घेऊन परिचारक समर्थक रिंगणात उतरले आहेत. त्यामुळे भाजपच्या खासदाराविरुध्द परिचारक समर्थक उभे राहिल्यामुळे अंतर्गत कलह वाढला आहे. परिचारक –महाडिक यांच्यातील वाद हा जुना आहे. मोहोळ विधानसभेवर भाजपचा झेंडा फडकवण्यासाठी खासदार धनंजय महाडिक यांची पुन्हा एकदा भीमा साखर कारखान्यावर सत्ता येणे भाजपसाठी गरजेचे आहे.

# शहरात शिवसेनेच्या शिंदे - बरडे जिल्हाप्रमुखांचा वाद पेटला

**स्वत:चे हिंदुत्व तपासा; मग माझ्या नेत्याची हिम्मत काढा**

**अमोल शिंदेचा पुरूषत्तोम बरडेंवर हल्लाबोल**

**सुराज्य/सोलापूर**

सोलापूरात ठाकरे गटाचा आणि एकनाथ शिंदे गटातील वादा आता उफाळून आला आहे. ठाकरे गटाचे जिल्हाप्रमुख पुरूषत्तोम बरडे आणि एकनाथ शिंदे गटाचे जिल्हाप्रमुख अमोल शिंदे यांच्यात वादाची ठिंणगी पडली आहे. बरडे यांनी हिंदूतवाच्या मुद्यावर मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यावर टिका केल्यानंतर शिंदे यांनी बरडे यांना खुले आव्हान देत स्वत:चे हिंदुत्व तपासा मग मोठा घास घ्या असा प्रतिटोला लगावला आहे.


ठाकरे शिवसेना गटाचे जिल्हाप्रमुख पुरुषोत्तम बरडे यांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची हिम्मत काढत राज्यातील शिंदे-फडणवीस सरकार हे खरे हिंदुत्ववादी असेल तर औरंगाबाद मधील औरंगजेब यांची कबर पाडून त्याठिकाणी छत्रपती संभाजी महाराज यांचे स्मारक बांधावी असे आवाहन बरडे यांनी केले होते. याला एकनाथ शिंदे गटाचे जिल्हाप्रमुख अमोल शिंदे यांनी बरडे यांना टार्गेट केले आहे. ठाकरे शिवसेना गटाचे हिंदुत्व संपलेले आहे. मागील साडे सात वर्षात पहिले पाच वर्षे फडणवीस-ठाकरे सरकार होते, नंतर अडीच वर्षे सोनिया-पवार-ठाकरे सरकार होते. तेव्हा तुम्ही ही बोलण्याची हिम्मत दाखवायला पाहिजे होती.



तेव्हा तुमच्यातील शिवसैनिक जिवंत दिसला असता. आता तुमच्याकडे हिंदुत्ववादी माणसे राहिली नाहीत आणि सेक्युलर लोक तुम्हाला स्वीकारायला तयार नाहीत त्यामुळे आता तुम्हाला हिंदुत्ववादीची आठवण होत आहे. स्वत:च्या फायद्यासाठी शहरात सोयीचे राजकारण करत सोयींनुसार प्रत्येक निवडणूकीला भुमिका बदल तडजोडीचे राजकारण करण्यांनी मुख्यमंत्र्याबद्दल बोलण्याची हिम्मत कृपया करू नय. , अन्यथा तुमची हिम्मत किती आहे. ती काढावी लागेल असा इशारा शिंदे यांनी बरडे यांना दिला आहे. राज्यातील औरंगजेब आणि अफ़जल खान यांच्या कबरी या छत्रपती शिवाजी महाराज यांच्या शौर्याचे प्रतीक आहेत. अशा विषयाला हात घालून जाणीवपूर्वक राज्यात जातीय तेढ निर्माण करण्याचा प्रयत्न करू नये असा सल्ला शिंदे यांनी बरडे यांना दिला आहे. आता हा वाद कोणते स्वरूप घेते याकडर सर्वांचे लक्ष लागले आहे.

## महेश पात्रुडकर यांचे निधन

**सुराज्य/सोलापूर :** राष्ट्रीय स्वयंसेवक संघ जनकल्याण समितीचे जिल्हा कार्यवाह आणि सोलापूर जनता सहकारी बँकेचे शाखा व्यवस्थापक महेश पात्रुडकर (वय ५१) यांचे गुरुवारी हृदयविकाराच्या तीव्र झटक्याने निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर गुरुवारी रात्री मोदी स्मशानभूमी येथे अंत्यसंस्कार करण्यात आले. यावेळी राष्ट्रीय स्वयंसेवक संघ, जनकल्याण समिती, जनता बँक, विवेकानंद केंद्र, संघ परिवारातील कार्यकर्ते तसेच मित्रपरिवार मोठ्या संख्येने उपस्थित होता. त्यांचे मरणोत्तर नेत्रदान केले. बालपणापासून राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे स्वयंसेवक असलेले महेश पात्रुडकर यांनी रा.स्व. संघात विविध जबाबदाऱ्यांवर काम केले.




सोलापूर जनता सहकारी बँकेतही त्यांनी कौतुकास्पद कामगिरी बजावली. त्यांच्या पश्चात पत्नी, दोन मुली, बहिण असा परिवार आहे.

## डीसीसी बँकेच्या प्रशासकपदी भोळे यांची नियुक्ती

**सुराज्य/सोलापूर :** जिल्हा उपनिबंधक कुंदन भोळे यांची सोलापूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या प्रशासकपदी नियुक्ती करण्यात आली आहे. भोळे यांच्यासोबत जिल्हा विशेष लेखापरीक्षक विष्णू डोके यांची सदस्य म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे.

राज्याचे सहकार आयुक्त अनिल कवडे यांनी ३१ ऑक्टोबर २०२२ रोजी हे आदेश काढले आहेत. सोलापूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे प्रशासक शैलेश कोतमारे यांच्या जागेवर कामकाज पाहण्यासाठी सहकार आयुक्त कवडे यांनी द्विसदस्यीय प्रशासक मंडळाची नियुक्ती केली आहे. त्यात प्रशासक कुंदन भोळे असून सदस्य म्हणून डोके यांचा समावेश आहे. राज्याचे तत्कालीन सहकार मंत्री सुभाष देशमुख यांनी २३ मे २०१८ रोजी सोलापूर जिल्हा मध्यवर्ती बँकेतील गैरव्यवहार पाहता संचालक मंडळ बरखास्त करून प्रशासक म्हणून तत्कालीन जिल्हा उपनिबंधक देशमुख यांची नियुक्ती केली होती. पाच महिन्यानंतर ऑक्टोबर २०१८ पासून अप्पर निबंधक शैलेश कोतमीरे यांची नियुक्ती करण्यात आली होती. त्यांनी चार वर्षे कामकाज पाहिल्यानंतर कोतमीरे यांच्या जागेवर विद्यमान जिल्हा उपनिबंधक भोळे यांची नियुक्ती करण्यात आली आहे. कोतमारे यांनी चार वर्षात चांगले कामकाज करून बँक नावारूपाला आणली आहे. त्यामुळे कर्मचारी व अधिकाऱ्यांमध्ये चांगले वातावरण राहीले. कोतमिरे यांच्या बदलीला खुद्द कर्मचाऱ्यांनी विरोध केला होता.



श्री मार्कंडेय रुग्णालयाच्या चेअरमनपदी डॉ. विजयकुमार आरकाल तर व्हाईस चेअरमनपदी श्रीनिवास कमटम यांची निवड झाल्याबद्दल त्यांचा सत्कार करताना बाळासाहेब वाघमारे, राजू हौशेट्टी, पप्पू गायकवाड, श्रीनिवास महांकाळ, व्यंकटेश दुडम आदी.

# अकलूजमध्ये डाळिंबाला मिळतोय विक्रमी दर

**अकलूजच्या कृषी ऊत्पन्न बाजार समितीची डाळींबाची पंढरी म्हणून नवी ओळख**

**सुराज्य/अकलूज**

अकलुजच्या शंकरराव मोहिते-पाटील कृषी ऊत्पन्न बाजार समितीची नवी ओळख डाळींबाची पंढरी होऊ लागली आहे. आज बाजार समितीमध्ये भगव्या डाळींबाला प्रती किलोस २२१/- रूपये भाव मिळाल्यामुळे शेतकरी वर्गात आनंदाचे वातावरण पसरले आहे.

आज बाजार समितीच्या लिलावामध्ये अमित जाधव यांचे श्री जय अंबे फ्रुट कंपनी गाळा नं.



३२/३३ मध्ये मनोज वाघमोडे रा. माळशिरस या शेतक-याच्या भगवा जातीच्या डाळींबास किलोस २२१/-रूपये ऐवढा विक्रमी दर मिळाला त्यामुळे शेतकरी वर्गात उल्हासाचे व आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे. याप्रसंगी डाळींब व्यापारी खंडु नाना जाधव, नागेश केदार, सादिक बागवान व बहुसंख्य सांगोला, पंढरपुर, करकंब व अकलुज परिसरातील व्यापारी हजर होते. समितीचे सभापती मदनसिंह मोहिते-पाटील यांचे मोलाचे सहकार्य व यशस्वी मार्गदर्शन सचिव राजेंद्र काकडे यांचे नियोजन व मोलाचे सहाय्य व कार्य कुशल कर्मचारी वर्ग यांचेमुळे अकलुज ही ऊस क्षेत्राबरोबरचडाळींबाची पंढरी म्हणुन नावारुपाला आली असुन तालुक्यात डाळींब क्षेत्र लागवडीस शेतक-यांचा कल वाढला आहे.

यावेळी उपमुख्यमंत्री विजयसिंह मोहिते-पाटील, सहकार महर्षी कारखान्याचे चेअरमन जयसिंह मोहिते-पाटील व सभापती मदनसिंह मोहिते-पाटील यांनी अमित जाधव व इतर शेतक-यांचे अभिनंदन व कौतुक केले.

# रंगभूमी दिनानिमित्त झाला कलावंतांचा गौरव

**सुराज्य/सोलापूर**



रंगभूमी दिनाचे औचित्य साधून सोलापुरातील नाट्यक्षेत्रात भरीव योगदान देणाऱ्या रंगकर्मींचा गौरव लायन्स क्लब ऑफ सोलापूर आणि लिओ क्लब ऑफ सोलापूर यांच्यावतीने करण्यात आला. यावेळी जीवनगौरव आणि कला गौरव पुरस्कारांचे वितरण झाले.

रंगभवन येथील मेसॉनिक हॉल येथे हा कार्यक्रम झाला. या गौरव समारंभास प्रमुख पाहुणे म्हणून अखिल भारतीय मराठी नाट्य परिषदेचे अध्यक्ष माजी आमदार प्रकाश यलगुलवार उपस्थित होते. तर लायन्स क्लबचे प्रथम उपप्रांतपाल भोजराज नाईक निंबाळकर यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी व्यासपीठावर लायन्स क्लब ऑफ सोलापूरच्या अध्यक्षा अमिता कारंडे, सचिवा आरती इंगळे उपस्थित होत्या.

विद्या काळे, राजा राजेशचंद्र, शशिकांत बटाणे यांना जीवनगौरव तर गुरुनाथ वठारे, ओमप्रकाश श्रावण यांना कलागौरव पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. सन्मानपत्र, शाल, पुष्पहार घालून या रंगकर्मींचा सन्मान करण्यात आला.अखिल भारतीय मराठी नाट्य परिषदेचे अध्यक्ष प्रकाश यलगुलवार म्हणाले, नाटक हाच रंगकर्मींचा श्वास असतो. नाटकासाठी सर्वस्व अर्पण करण्याची रंगकर्मींची तयारी असते. यातूनच महान रंगकर्मी घडत जातो. लायन्स क्लब ऑफ सोलापूर गेल्या १८ वर्षांपासून रंगकर्मींचा सन्मान करत आहे ही कौतुकास्पद बाब आहे. सामाजिक, शिक्षण, क्रीडा, कला अशा सर्वच क्षेत्रात लायन्स क्लब काम करत आहे. कलावंतांना ऊर्जा देण्याचे काम या माध्यमातून होत आहे, असेही श्री यलगुलवार यावेळी नरेंद्र गंभीरे, रमेश जैन सचिन पाटील, अकबर मुल्ला, पद्मजा कुलकर्णी, श्रीकांत सोनी, अण्णासाहेब कोतली, संतोष काबरा, दिनेश बिराजदार, अमोल गवसने, संगीता नाडकर्णी, मिनाक्षी पाचकवडे आदी उपस्थित होते. क्लबच्या अध्यक्षा अमिता कारंडे यांनी प्रास्ताविक केले. भगवान जाधव आणि सुनिता जाधव यांनी सूत्रसंचालन तर क्लबच्या सचिवा आरती इंगळे यांनी आभार प्रदर्शन केले.

Form No. 4

IN THE COURT OF Hon. Sri. Rama Naik

ADDL. DISTRICT AND SESSIONS JUDGE-FTSC-I SPECIAL COURT FOR POCSO CASES, VIJAYAPURA

PROCLAMATION REQUIRING THE APPEARANCE OF A PERSON ACCUSED (See Section 82)

Spl.Case(POCSO)/35/2022 The State of Karnataka SHO Indi Rural Police Station Vs Channavva Hugar INDI RURAL PS/105/2021 NEXT DATE : 09-11-2022

PUBLISHED THROUGH

WHEREAS complaint has been made before me that **Channavva Hugar**, Age - 0 years, R/o. - **Bandarakavate, Tq-Dist Solapur** has committed (or is suspected to have committed) the offence of punishable under section **342, 344, 366, 307, 376(2)(i)IPC** of the **Protection of Children From Sexual Offences Act,** and it has been returned to a warrant of arrest thereupon issued that the said **Channavva Hugar** cannot be found, and whereas It has been shown to my satisfaction that the said **Channavva Hugar** has absconded (or is concealing himself to avoid the service of the said warrant);

Proclamation is hereby made that the said **Channavva Hugar**, Age - 0 is required to appear **VIJAYAPURA** before **ADDL. DISTRICT AND SESSIONS JUDGE-FTSC-I SPECIAL COURT FOR POCSO CASES** to answer the said complaint on the day of 09-11-2022 .

Dated, this day of 10-10-2022

Proclamation to be published on or before : 11-10-2022

Proclaimed accused to be produced on or before : 09-11-2022

Court Stamp

sd/-

ADDL. DISTRICT AND SESSIONS JUDGE-FTSC-I SPECIAL COURT FOR POCSO CASES, VIJAYAPURA


- Visit : ecourts.gov.in for updates or download mobile app "eCourts Services" from Android or IOS
- The process is System generated and transmitted in secured manner by authorised user as such physical signature not applied Note : For speedy justice get your case settled in National e-Lok/Lok adalath to be held on 12/11/2022 for more information contact DLSA/TLSC, Vijayapura.



## राष्ट्रीय स्पर्धेत महाराष्ट्र खो-खो किशोर किशोरी संघाला सुवर्णपदक

सुराज्य/वेळापूर : फलटण येथे झालेल्या ३२ व्या राष्ट्रीय खो-खो स्पर्धेत महाराष्ट्राच्या किशोर-किशोरी संघाने सुवर्णपदक मिळवले आहे.

या किशोरी संघामध्ये इंग्लिश स्कूल वेळापूर प्रशालेची विद्यार्थिनी व अर्धनारी नटेश्वर क्रीडा मंडळाची खो-खो खेळाडू कुमारी प्राजक्ता सोमनाथ बनसोडे ही या राष्ट्रीय खो-खो संघात खेळाडू होती. तिच्या यशाबद्दल व तिला मार्गदर्शन करणारे इंग्लिश स्कूलचे मुख्याध्यापक आर. बी. पवार, राष्ट्रीय प्रशिक्षक सोमनाथ बनसोडे, राष्ट्रीय पंच व वेळापूर उपसरपंच जावेद मुलाणी, भरत अवॉर्ड विजेता जावेद अत्तार, क्रीडा शिक्षक सतीश कदम, शिवाजी जाधव, श्रीनाथ खटके, पोलीस शहाजी मंडले, अजित बनकर, वैभव बनसोडे, धनंजय शिवपुजे यांचे मार्गदर्शन लाभले. प्राजक्ता बनसोडे व तिला मार्गदर्शन करणारे शिक्षक या सर्वांचे राष्ट्रवादी कॉंग्रेसचे जिल्ह्याचे नेते उत्तमराव जानकर, जि. प. सदस्य बाळासाहेब धाईंजे, वेळापूर सरपंच विमल जानकर, उपसरपंच जावेद मुलाणी तसेच ग्रामपंचायत सदस्य संजयआबा मंडले, संदीपतात्या माने-देशमुख, मार्केट कमिटीचे माजी संचालक दादासाहेब घाडगे, लखन मंडले, विनायक माने, राष्ट्रवादी कॉंग्रेस सामाजिक न्याय विभाग तालुका अध्यक्ष रजनीश बनसोडे, धानोरे सरपंच जीवन जानकर, भाऊसाहेब जानकर, दलित मित्र महाविद्यालय मंगळवेढा प्राचार्य डॉ. सुभाष कदम, संस्थेच्या मार्गदर्शिका डॉ. मीना कदम, संस्थेचे अध्यक्ष ॲड. सुजीत (बापू) कदम, उपप्राचार्य तेजस्विनी कदम महाडिक, संस्थेच्या सचिवा प्रियदर्शनी महाडिक, इंग्लिश स्कूल वेळापूर स्कूल कमिटीचे चेअरमन प्रतापराव पाटील, रिपाइं माळशिरस तालुका अध्यक्ष व शिक्षक पालक संघाचे उपाध्यक्ष मिलिंद सरतापे, मुख्याध्यापक आर. बी. पवार, उपमुख्याध्यापक सुनील खंदारे, पर्यवेक्षक शिवशरण पठाण, सत्यजित बारंगुळे, भास्कर बागल यांनी अभिनंदन केले आहे.



## शहीद शिवराम चौगुले यांना अभिवादन

सुराज्य/दक्षिण सोलापूर : दक्षिण सोलापूर तालुक्यातील कासेगावचे सुपुत्र शहीद शिवराम विश्वनाथ चौगुले यांचा २९ वा स्मृतिदिन बुधवारी, २ नोव्हेंबर रोजी साजरा करण्यात आला.

शहीद शिवराम चौगुले यांच्या स्मृतिदिनी, त्यांच्या स्मृतिस्मारकास सोमपा नगरसेवक विक्रांत उपाख्य मुन्ना वानकर यांच्या हस्ते पुष्पहार अर्पित करून अभिवादन करण्यात आले. यावेळी शहीद शिवराम चौगुले यांचे चिरंजीव प्रवीण चौगुले यांची प्रमुख उपस्थिती होती. बुधवारी या स्मृतिस्मारकांना नगरसेवक विक्रांत उपाख्य मुन्ना वानकर, सुभाष पवार, योगेश चिंचोळी, अमित लाड यांच्या हस्ते पुष्पहार अर्पित करून अभिवादन करण्यात आले. याप्रसंगी द्राक्ष बागायतदार संघाचे संचालक शंकर येणेगुरे, बालाजी चौगुले, जनार्दन काळे, उपसरपंच शंकर वाडकर, लक्ष्मण ढेकळे, राजाराम पाटोळे, शामराव इटुकडे, चंद्रकांत पाटील, विश्वास गजभार, यशपाल वाडकर, संजय जाधव, संजय चौगुले, संजय पवार, केशव ढेकळे, ज्ञानेश्वर कदम, अण्णा चौगुले, चंद्रकांत चव्हाण, संतोष भोजने, विक्रम मेटकरी, संग्राम जाधव, अप्पा चौगुले, गणेश भोजने, सच्चिदानंद चौगुले, विश्वजित चौगुले, सचिन गरड, अमोल गरड, राम गुरव, महेश गायकवाड, अक्षय चौगुले,तुकाराम भोसले आणि चौगुले परिवारातील सदस्य उपस्थित होते.

## ३६ हजार रुपयांच्या लोखंडी प्लेटाची चोरी

सुराज्य/कुर्डूवाडी : भोसरे (ता. माढा) येथील राहत्या घरासमोरील व वेगवेगळ्या बांधकामावर सुमारे ३६ हजार ४०० रुपयांच्या एकूण ९१ सेंट्रींगच्या प्लेटा चोरीला गेल्या. ही घटना दि. १८ ऑक्टोबर रोजी राऊत वस्ती भोसरे (ता. माढा) येथे घडली. कुर्डूवाडी पोलीस ठाण्यात हनुमंत अंबादास देवडे रा. श्रीरामनगर राऊतवस्ती भोसरे यांनी फिर्याद दिली आहे.

याबाबत पोलिसांनी दिलेली माहिती अशी फिर्यादी देवडे यांचा सेंट्रींगचा व्यवसाय असून त्यांच्याकडे असलेल्या सेंट्रींगच्या प्लेटा ते स्वतःच्या कामाकरिता व इतरांनाही भाड्याने देतात. दि. १७ रोजी रात्री झोपण्यापूर्वी देवडे यांच्या घरासमोर ५० प्लेटा होत्या. दुसऱ्या दिवशी दि.१८ रोजी सकाळी ६ वा उठून पाहिले असता दारात फक्त एकच प्लेट शिल्लक होती. याचा दवडे इतर बांधकामावर शोध घेत होते. त्यावेळी सुनील गोरे घाटणे ता. माढा, सोमनाथ अर्जुन गाडे, रा. घाटणे ता. माढा यांची भेट झाली असता त्यांच्याही दत्तनगर भोसरे येथे चालू असलेल्या कामावरून २७ लोखंडी प्लेटा तुकाराम नगर येथे चालू असलेल्या बांधकामावरून १५ लोखंडी प्लेटा चोरीला गेल्या असल्याचे सांगितले. या तिघांनी मिळून सर्वत्र शोध घेतला असता मिळून आल्या नाहीत. त्यामुळे दि.१ नोव्हेंबर रोजी देवडे यांच्या फिर्यादीवरून सदर चोरीचा गुन्हा कुर्डूवाडी पोलिसांत दाखल झाला आहे.

# अखेर 'भीमा'ची निवडणूक लागली

# पाटील-परिचारकांनी धुडकावली महाडिकांची विनंती

सुराज्य/विरवडे बु.

**मोहोळ तालुक्यातील टाकळी सिकंदर येथील भीमा सहकारी साखर कारखान्याची पंचवार्षिक निवडणूक बिनविरोध करण्याचे आवाहन विरोधकांना विद्यमान अध्यक्ष तथा खासदार धनंजय महाडिक यांनी केले होते. मात्र, माजी आमदार प्रशांत परिचारक आणि माजी आमदार राजन पाटील यांनी महाडिकांनी धुडकावून लावत भीमा बचाव परिवर्तन आघाडीच्या नावाखाली आपले उमेदवार जाहीर केले आहेत. त्यामुळे भीमा कारखाना बिनविरोध न होता त्याची निवडणूक लागली आहे.**




भीमा सहकारी साखर कारखान्यासाठी आता भीमा शेतकरी विकास आघाडी विरुद्ध भीमा बचाव परिवर्तन आघाडी अशी दुरंगी लढत होत आहे. या निवडणुकीकडे संपूर्ण सोलापूर जिल्ह्याचे लक्ष वेधले आहे. भीमा कारखान्यासाठी येत्या १३ तारखेला मतदान होणार असून १४ तारखेला मतमोजणी होणार आहे. खासदार धनंजय महाडिक यांनी भीमा कारखान्याची निवडणूक बिनविरोध करावी, असे आवाहन विरोधकांना केले होते. मात्र, विरोधकांनी ते अमान्य करीत निवडणूक प्रक्रिया सुरू केली आहे. महाडिक यांनी निवडणुकीत आपल्या पॅनेलमधून सहा नवीन चेहऱ्यांना संधी दिली आहे तर उर्वरित जुने आहेत. त्यामुळे जुन्या नव्यांचा मेळ घालण्याचा प्रयत्न खा. धनंजय महाडिक यांनी केला आहे.

दरम्यान, भीमा सहकारी साखर कारखान्याच्या निवडणुकीत खासदार महाडिक यांचे सुपुत्र विश्वराज महाडिक हे पुळुज गटातून उभे आहेत, तर त्यांच्या विरोधात भीमा बचाव'चे कारखान्याचे उपाध्यक्ष राहिलेले कल्याणराव पाटील उभे आहेत. कारखान्याचे सध्याचे उपाध्यक्ष सतीश जगताप यांना पुन्हा संधी देण्यात आली आहे. भाजपचे तालुकाध्यक्ष सुनील चव्हाण हे टाकळी सिकंदर गटातून उभे आहेत. संस्था प्रतिनिधी गटातून खासदार धनंजय महाडिक हे स्वतः निवडणुकीच्या रिंगणात आहेत, त्यांच्या विरोधात भीमा बचावचे राजेंद्र आदिनाथ चव्हाण उभा आहेत.

सर्वांचे लक्ष असलेल्या कोन्हेरी गटातून सध्याचे संचालक राजेंद्र टेकळे यांना भीमा विकास आघाडीने पुन्हा संधी दिली आहे, तर त्यांच्या विरोधात जनहित शेतकरी संघटनेचे तालुकाध्यक्ष कुमार गोडसे उभा आहेत. भीमा बचाव आघाडीकडून पंढरपूर कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती दिलीप घाडगे यांच्या पत्नी अर्चना घाडगे यांना संधी देण्यात आली आहे, तर त्याच गटातून भीमा विकास आघाडीतून सिंधू चंद्रसेन जाधव यांना पुन्हा संधी देण्यात आली आहे.

दरम्यान, निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर खासदार महाडिक यांचे सुपुत्र विश्वराज महाडिक यांनी गेल्या आठवड्यापासून 'होम टू होम' जाऊन सर्व वातावरण ढवळून काढले आहे. या निवडणुकीत काय होणार, हे येत्या १४ तारखेलाच समजणार आहे.

**भीमा शेतकरी विकास आघाडीचे उमेदवार पुढीलप्रमाणे -**
पुळूज गट : विश्वराज धनंजय महाडिक, बीभिषण बाबा वाघ
टाकळी सिकंदर गट : सुनील रावसाहेब चव्हाण, संभाजी नामदेव कोकाटे
सुस्ते गट : संतोष चंद्रकांत सावंत, तात्यासाहेब चंद्रकांत नागटिळक
अंकोली गट : सतीश नरसिंग जगताप, गणपत महादेव पुदे
कोन्हेरी गट : राजेंद्र गोरख टेकळे,
महिला राखीव गट : सिंधू चंद्रसेन जाधव, प्रतीक्षा बाबूराव शिंदे
इतर मागासवर्गीय गट : अनिल आगतराव गवळी,
भटक्या विमुक्त जाती जमाती गट : सिद्राम ज्ञानोबा मदने
अनुसूचित जाती जमाती गट : बाळासाहेब बापू गवळी
संस्था प्रतिनिधी गट : खा धनंजय भीमराव महाडिक
भीमा बचाव परिवर्तन आघाडीचे उमेदवार
पुळुज गट : कल्याणराव आप्पाराव पाटील, देवानंद रावसाहेब गुंड
टाकळी सिकंदर गट : राजाराम दगडू माने, शिवाजी संदिपान भोसले
सुस्ते गट : पंकज मच्छिंद्र नायगुडे, विठ्ठल दत्तात्रेय रणदिवे
अंकोली गट : भारत गोविंद पवार, रघुनाथ नेमिनाथ सुरवसे
कोन्हेरी गट : कुमार महादेव गोडसे
महिला राखीव गट : सुहासिनी शिवाजी चव्हाण, अर्चना दिलीप घाडगे
अनुसूचित जाती जमाती गट : भारत सुदाम सुतकर
इतर मागास प्रवर्ग : राजाभाऊ कुंडलिक भंडारे
भटक्या विमुक्त जाती जमाती गट : राजू विठ्ठल गावडे
संस्था गट : राजेंद्र आदिनाथ चव्हाण

## कुमारस्वामी नगरात तरुणाची गळफास घेऊन आत्महत्या

सोलापूर : कुमारस्वामी नगरात राहणाऱ्या एका २० वर्षीय तरुणाने राहत्या घरात गळफास घेऊन आत्महत्या केली. ही घटना आज गुरुवारी दुपारच्या सुमारास घडली. व्यंकटेश लक्ष्मण कोंडा (वय २०रा.कुमारस्वामी नगर) असे मयताचे नाव आहे. आज दुपारी एक वाजेच्या सुमारास घरात कोणी नसताना त्याने छताच्या लोखंडी अँगलला दोरीने गळफास घेतला होता. मयत व्यंकटेश हा हैद्रबाद येथे भावाजवळ राहत होता. दीड महिन्यापूर्वी तो सोलापुरात वडीलाकडे आला होता. दीड वर्षांपूर्वी त्याच्या आईचे निधन झाले होते. त्यामुळे तो नेहमी निराश रहात होता. त्यातूनच त्याने आत्महत्या केली अशी प्राथमिक नोंद एमआयडीसी पोलिसात झाली. हवालदार कटके पुढील तपास करीत आहेत.

**मोकाट गाय तुडवल्याने पुण्याच्या भावीक जखमी**

सोलापूर-देवदर्शन आटोपून परत येताना मोकाट गाय ढुसणी मारून तुडवल्याने पुणे येथील भावीक जखमी झाला. ही घटना तुळजापूर येथे आज गुरुवारी सकाळच्या सुमारास घडली. गणेश मनोज विद्ये (वय२३ रा. कात्रज, पुणे) असे जरवमीचे नाव आहे. त्यांना तुळजापूर येथे प्राथमिक उपचार करून सोलापुरातील शासकीय रुग्णालयात ओंकार (भाऊ) यांनी दाखल केले.गणेश विद्ये हे सकाळी मंदीरात दर्शन घेऊन परत येत होते. पद्मशाळी धर्मशाळेजवळ एका गाईने त्यांना धक्का दिल्याने ते खाली कोसळले. त्यानंतर तुडवल्याने ते जखमी झाले. अशी नोंद सिव्हील पोलिसात झाली आहे.

**कासेगाव येथे डोळ्यात तिखट टाकून महिलेस मारहाण**

कासेगाव (ता.पंढरपूर) येथे डोळ्यात तिखट टाकून काठीने केलेल्या मारहाणीत कविता समाधान डोणे (वय ३०) ही महिला जखमी झाली. ही घटना बुधवारी रात्री ८ वाजेच्या सुमारास घडली. त्या घरात एकटी असताना अनोळखी इसमाने घरात प्रवेश करून हा प्रकार केला. त्यानंतर त्यांना पंढरपूर येथे प्राथमिक उपचार करून सोलापुरातील शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आले.तालुका पोलिसात याची नोंद झाली आहे.

**सवतीतील भांडण दोघी जखमी: नळी येथील घटना**

सोलापूर-शेतात राहण्याच्या कारणावरून सवती मध्ये झालेल्या हाणामारीत दोघी जखमी झाल्या. ही घटना नळी (ता. पंढरपूर) येथे बुधवारी रात्रीच्या सुमारास घडली. दोघींना पंढरपूर येथे प्राथमिक उपचार करून सोलापुरातील शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आले. सिंधू विठ्ठल घोडके (वय ६०रा. नळी) असे जखमी महिलेचे नाव आहे. काल रात्री ९ वाजेच्या सुमारास त्यांची सवत सुमन घोडके आणि तिचा मुलगा नामदेव या दोघांनी शेतात राहण्याचा कारणावरून लाकडी फळी आणि दगडाने डोक्यात मारून जखमी केले. तर दुसऱ्या घटनेत सुमन विठ्ठल घोडके (वय ५० रा.नळी) या जखमी झाल्या. त्यांना काल सायंकाळी ७ वाजेच्या सुमारास गावात शेतीच्या वादातून सागर येवले आणि सचिन घोडके या दोघांनी काठी आणि हातापायाने मारहाण केली. अशी नोंद पोलिसात झाली आहे.

## मार्डी विभाग प्रमुखपदी लक्ष्मण राठोड

सुराज्य/उत्तर सोलापूर

बाळासाहेबांची शिवसेना तालुका उत्तर सोलापूरची बैठक जिल्हाप्रमुख अमोल शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली, तालुकाप्रमुख सुधीर गोरे, जिल्हा सचिव जावेद पटेल, उपजिल्हाप्रमुख संजय सरवदे, राजकुमार शिंदे, उपतालुका प्रमुख नंदकुमार गवळी यांच्या उपस्थितीत संपन्न झाली. यावेळी कारंबा येथील माजी सरपंच दिलीप मस्के, एकरुखचे माजी सरपंच मधुकर गुत्ती यांनी प्रवेश केला. उत्तर तालुक्यातील नवीन पदाधिकाऱ्यांची निवडी करण्यात आल्या. त्या पुढीलप्रमाणे,

उत्तर तालुका समन्वयक-अशपाक शेख, युवा सेना उपतालुकप्रमुख मार्डी गण धनराज महापुरे, मार्डी विभागप्रमुख-लक्ष्मण राठोड. यावेळी आकाश गजघाटे, कय्युम जमादार, अनिकेत लोंढे, योगेश जानराव, अरुण गरड, सुरेखा कसबे उपस्थित होते.



## ऊसदर संघर्ष समितीतर्फे रास्ता रोको आंदोलन

सुराज्य/कुर्डूवाडी

**उसाची पहिली उचल २५०० रुपये व अंतिम दर ३१०० मिळावा, ओव्हरलोड ऊस वाहतूक वाहनावर आरटीओने कारवाई करावी यासह विविध मागण्यासाठी माढा तालुका ऊसदर संघर्ष समितीच्यावतीने कुर्डूवाडी बार्शी रोडवरील रिधोरे (ता. माढा) येथे रस्ता रोको आंदोलन करण्यात आले.**

दिलेल्या निवेदनामध्ये साखर कारखान्याचे वजन काटे ऑनलाईन करावेत, गोपीनाथ मुंढे विकास महामंडळामार्फत तोडणी व वाहतूकदार यांचे करार करावेत, उसाची पहिली उचल २५०० रुपये व अंतिम दर ३१०० मिळावा, ओव्हरलोड ऊस वाहतूक वाहनावर आरटीओने कारवाई करावी, या मागणीसाठी कुर्डूवाडी, बार्शी रस्त्यावरील रिधोरे ता. माढा येथे ऊस दर संघर्ष समितीच्यावतीने रास्ता रोको आंदोलन करण्यात आला. यावेळी दुतर्फा वाहनांच्या रांगा लागल्या होत्या.

यावेळी संघटनेचे जिल्हाध्यक्ष शिवाजी पाटील, कार्याध्यक्ष अजिनाथ परबत, सिद्धेश्वर घुगे, सत्यवान गायकवाड, नागनाथ जाधव, दत्तात्रेय गायकवाड, शांतीलाल गवळी, हनुमंत सातव, विजय भोसले, दत्तात्रय कदम, अशोक गवळी, गजेंद्र शिंदे, अमोल गायकवाड, सलीम शेख, विक्रांत गायकवाड, सुनील पंडित, संतोष चौधरी, सुनील चौधरी, अमोल गवळी, विक्रांत महाडिक, सुभाष तरंगे, आप्पासाहेब ढोरेसह आदी कार्यकर्ते, पदाधिकारी, शेतकरी उपस्थित होते.

## आ. कल्याणशेट्टी, देशमुख यांच्या वाढदिवसानिमित्त रक्तदान शिबिर

सुराज्य/अक्कलकोट

आचेगाव (ता. दक्षिण) सोलापूर येथे भारतीय जनता पार्टी अनु. जाती दक्षिण सोलापूर च्या वतीने शनिवार दि. ५ नोव्हेंबर रोजी सोलापूर भाजपा चे जिल्हाध्यक्ष आमदार सचिन कल्याणशेट्टी व महाराष्ट्र युवा मोर्चा प्रदेश उपाध्यक्ष मनिष भैया देशमुख यांच्या वाढदिवसानिमित्त भव्य रक्तदान शिबिराचे उद्घाटन माजी सहकारमंत्री आ. सुभाष देशमुख यांच्या हस्ते करण्यात येणार असल्याची माहिती आयोजक तालुकाध्यक्ष बलवान गोतसुर्वे यांनी दिली.

यावेळी पंचायत समितीचे माजी उपसभापती यांच्या अध्यक्षतेखाली व




रक्तदान शिबिराबरोबरच वस्ती संपर्क अभियान, वृक्षारोपण व आजच्या दिवशी थोर समाजसेवक ख्यातनाम कीर्तनकार कालकथित आप्पाराव सिद्राम गोतसुर्वे यांच्या २३ व्या पुण्यस्मरणदिना निमित्त मान्यवरांच्या हस्ते पुष्पांजली वाहण्यात येणार आहे. यावेळी प्रदेश युवा मोर्चा उपाध्यक्ष मनिष भैया देशमुख, नगरसेवक मीलन कल्याणशेट्टी भाजपा तालुकाध्यक्ष रामप्पा चिवडशेट्टी, तहसीलदार अमोल कुंभार, गटविकास अधिकारी बाळासाहेब वाघ, युवा नेते आदर्श उद्योजक महेश बिराजदार, पी. आय. अतुल भोसले, सरपंच रमेश क्षीरसागर, तंटामुक्त अध्यक्ष भगवान गोतसुर्वे, ग्रामसेवक रमेश गायकवाड, माजी उपसरपंच हारून बिराजदार, दत्ता पाटील, हिराचंद माशाळे, पोलीस पाटील प्यारान मुल्ला, मल्लू खोबण, महिबूब पटेल, दिनेश गोतसुर्वे, हसन पटेल, अवधूत कोरे, उपसरपंच संजय पाटील, इरफान पटेल, कुलदीप पाटील, रायप्पा जळगोंडर, संयोजक संजय गोतसुर्वे, भारत सोनकांबळे, शरद गोतसुर्वे, आकाश सुर्वे आदी उपस्थित राहणार आहेत.

## चंद्रग्रहणामुळे अन्नछत्र मंडळाच्या नित्य दिनक्रमात बदल

### ग्रहण मोक्षानंतर रात्री ८ वा. नेहमीप्रमाणे महाप्रसाद : अमोलराजे भोसले

सुराज्य/अक्कलकोट : कार्तिक पौर्णिमा मंगळवार दि. ८ नोव्हेंबर रोजी ग्रस्तोदित खग्रास चंद्रग्रहण असल्याने या दिवशी येथील श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळाच्या नित्य दिनक्रमामध्ये बदल करण्यात आल्याची माहिती न्यासाचे प्रमुख कार्यकारी विश्वस्त अमोलराजे जन्मेंजयराजे भोसले यांनी दिली.



ग्रहणाचे वेध मंगळवार दि. ८ नोव्हेंबर रोजी सूर्योदयापासून सुरू होणार आहेत. ग्रहणाचे स्पर्श मंगळवारीच दुपारी २ वाजून ३९ मिनिटांनी होईल. ग्रहणाचे मध्य दुपारी ४.३० वा. होणार आहे. यानंतर ग्रस्तोदित राहील. त्यामुळे अन्नछत्रातील दुपारचा स्वामींचा नैवेद्य होणार नाही. तसेच दुपारचा महाप्रसाद बंद राहील. त्यानंतर रात्री ८ वा. नेहमीप्रमाणे महाप्रसाद दिला जाईल. तरी सर्व स्वामी भक्तांनी याची नोंद घेऊन सहकार्य करावे, असे आवाहन अमोलराजे भोसले यांनी केले आहेत.

सुराज्य सोलापूर
Classified
विवाह विषयक
● सर्व जाती धर्मातील प्रथम वधु/वर, विदुर, विधवा, घटस्फोटीत, आंतरजातीय, शासकीय/निमशासकी भरपूर स्थळे उपलब्ध. एकदाच नोंदणी करा लग्न जमेपर्यंत स्थळं उपलब्ध करुन दिले जातील.
श्री तुळजाभवानी वधु-वर सुचक केंद्र, तुळजापूर.
संपर्क : 7387906921
(121122)

# 'महाराष्ट्र केसरी' वरून संघटनांमध्येच 'कुस्ती'

### स्पर्धेच्या आयोजनावरून डाव-प्रतिडाव; पैलवानांमध्ये संभ्रम

सुराज्य/सोलापूर

महाराष्ट्र केसरी स्पर्धा नेमकी अधिकृत कुणाची? असा प्रश्न पैलवान व कुस्ती शौकिनांना पडला आहे. भारतीय कुस्ती महासंघाने राज्य कुस्तीगीर परिषद बरखास्त केल्यावर 'अस्थायी समितीची' घोषणा झाली. या समितीने समितीने स्पर्धेची घोषणा केली आहे. तर बरखास्त केलेल्या कुस्तीगीर परिषदेने स्पर्धेचे वेळापत्रक लवकरच जाहीर करणार असल्याचे सांगितल्याने पैलवानांच्यात संभ्रम निर्माण झाला आहे. दोन्ही संघटना मध्ये 'महाराष्ट्र केसरी' साठी 'कुस्ती' लागली आहे. या दोन्ही गटाच्या नादात पैलवानांचे नुकसान होत आहे.

महाराष्ट्र केसरी कुस्ती स्पर्धेच्या आयोजनावरून नवीन वाद उभा राहिलाय. कुस्तीशी संबंधित राष्ट्रीय पातळीवरील संघटना असलेल्या भारतीय कुस्ती महासंघ आणि राज्यातील संघटना महाराष्ट्र कुस्तीगीर परिषदेचे माजी पदाधिकारी यांच्यामध्येच डावपेचांची लढत सुरू झालीय. बाळासाहेब लांडगे यांना पदावरून बरखास्त करण्यात आलं असताना त्यांना कुस्ती स्पर्धा भरविण्याचा अधिकारही देण्यात आलेला नाही. महाराष्ट्र केसरी कुस्ती स्पर्धेचे आयोजन नवीन स्थापन झालेल्या अस्थायी समितीतर्फे आणि पुणे शहर राष्ट्रीय तालीम संघ यांच्या सहकार्याने व पैलवान मुरलीधर मोहोळ संस्कृती प्रतिष्ठानद्वारे ६५ वी महाराष्ट्र केसरी स्पर्धा दि. १५ ते ३० डिसेंबर दरम्यान कोथरूड पुणे येथे होणार आहे. त्यासाठी निवड चाचणी कुस्ती स्पर्धा ३० नोव्हेंबरपूर्वी घेण्यात याव्यात, असे समितीचे अध्यक्ष संजयकुमार सिंह यांनी तशी घोषणा केली आहे.

काही दिवसांपूर्वी महाराष्ट्र कुस्तीगिर परिषदेची कार्यकारिणी भारतीय कुस्ती महासंघाने बरखास्त केली आहे. त्यानंतर भारतीय कुस्ती महासंघाकडून राज्यासाठी एका 'अस्थायी समितीची स्थापना' करण्यात आली. यंदाच्या महाराष्ट्र केसरी कुस्ती स्पर्धेच्या



आयोजनाची जबाबदारी पुणे राष्ट्रीय तालीम संघाकडे देण्याबाबतचा निर्णय या समितीने घेतला. पुण्याचे माजी महापौर मुरलीधर मोहोळ यांच्या पुढाकारातून या स्पर्धेचे आयोजन करण्यात येणार आहे. असे असताना भारतीय कुस्ती महासंघाने बरखास्त केलेल्या कार्यकारणीतील पदाधिकाऱ्यांनी महाराष्ट्र केसरी स्पर्धा आयोजित करण्याचा घाट घातला आहे.

**शासनाची मान्यता कोणत्या गटाला?**

नव्याने स्थापन झालेली अस्थायी समिती व महाराष्ट्र राज्य कुस्तीगीर परिषद या दोन्ही गटात स्पर्धा आयोजनाबाबत कुस्ती सुरू झाली आहे. 'महाराष्ट्र केसरी' किताबाची स्पर्धा ही राज्यात अतिशय प्रतिष्ठेची मानली जाते. अस्थायी समिती व राज्य कुस्तीगीर परिषद या दोन्ही गटांनी स्पर्धा आयोजनाबाबत आपली प्रतिष्ठापणाला लावली आहे. राज्यस्तरीय अजिंक्यपद कुस्ती स्पर्धेतील विजेत्या मल्लांना शासनाच्यावतीने वर्षभर मानधन देण्यात येते. त्यामुळे दोन्ही गटापैकी शासनाची मान्यता कोणत्या गटाला मिळणार याची उत्सुकता कुस्ती शौकिनांना लागली आहे.

# हुकूमशाही विरोधात गांधींची भारत जोडो यात्रा : आ. शिंदे

## शहर-जिल्ह्यातून १५ हजार कार्यकर्ते जाणार

## १७ नोव्हेंबर रोजी काँग्रेसचा 'चलो अकोला'चा नारा

✔ सुराज्य/सोलापूर

महागाई, बेरोजगारी, शेतकरी व कामगार विरोधी धोरणे, सरकारी कंपन्या विकणे, संविधानिक संस्थाचा ग़ैरवापर, विरोधकांचा, पत्रकारांचा आवाज दाबुन टाकणाऱ्या हुकूमशाही मोदी सरकारच्या विरोधात सार्वसामान्यांच्या हितासाठी काढलेली ही भारत जोडो पदयात्रा आहे, असे प्रतिपादन आ. प्रणिती शिंदे यांनी केले.

अकोलो येथे १७ नोव्हेंबर रोजी यात्रेचे सोलापूर जिल्ह्याच्यावतीने स्वागत करण्यात येणार असून शहर आणि जिल्ह्यातून सुमारे १५ हजार कार्यकर्ते यात्रेत सहभागी होणार असल्याचे त्यांनी सांगितले.

अखिल भारतीय काँग्रेस कमिटीने काढलेली भारत जोड़ो पदयात्रा येत्या ०७ नोव्हेंबर रोजी महाराष्ट्रात दाखल होत आहे. १७ रोजी अकोल्यामध्ये सोलापूर जिल्ह्याच्यावतीने यात्रेचे स्वागत करण्यात येत आहे, त्याची माहिती देण्यासाठी आयोजित पत्रकार परिषदेत आ. शिंदे बोलत होत्या. यावेळी माजी गृहराज्यमंत्री सिध्दाराम म्हेत्रे, माजी आमदार प्रकाश यलगुलवार, जिल्हाध्यक्ष धवलसिंह मोहिते-पाटील, धनाजी साठे, शहर अध्यक्ष प्रकाश वाले, जिल्हा कार्याध्यक्ष सुरेश हसापुरे, बाबा मिस्त्री, चेतन नरोटे, शाहीन शेख, हेमाताई चिंचोळकर, सुदीप चाकोते आदी उपस्थित होते.



आ. शिंदे म्हणाल्या की, दिन, दलित, दिव्यांग, युवक, महिला, लहान मुले, अगदी प्राणी सुध्दा यात सहभागी झाले असून ही माणुसकीची यात्रा आहे. सोलापुर शहर व जिल्ह्याला अकोला जिल्ह्यातील बाळापुर विधानसभा मधील पातुर हे ठिकाण ठरवून दिले आहे. सोलापुर शहर व जिल्ह्यातील सर्व सहभागी होणारे पदयात्री होम मैदान येथून दिनांक १६ रोजी सकाळी दहा वाजता एकत्रित पणे बस, चारचाकी वाहनातून पातुर कड़े मार्गस्थ व्हायचे आहे.

१७ रोजी पहाटे ५:४५ वाजता सोलापुर शहर व जिल्ह्यातील सर्व पदयात्री एकत्रितपणे राहुल गांधी यांच्यासमोर शानदार एंट्री करुण सोलापुरचा प्रभाव दाखवून देणार आहेत. या सर्व पदयात्रेकरुंचे निवास, भोजन, जाण्यायेण्याची सोय करण्यात आलेली आहे. राहुलजी गांधी यांनी जे रणशिंग फुंकले आहे. सारा देश त्यांच्या बाजूने उभे राहतो आहे. या यात्रेला सर्वांचा चांगला प्रतिसाद मिळत आहे. या यात्रेने देशात निश्चितच परिवर्तन होईल. यावेळी सिध्दाराम म्हेत्रे, धवलसिंह मोहिते-पाटील यांनीही ग्रामीण भागातून जास्तीत जास्त कार्यकर्ते, नागरिक येतील, असा विश्वास व्यक्त केला.

याबैठकीचे सूत्रसंचालन सातलिंग शटगार तर आभार प्रदर्शन सुनील गोरे यांनी केले.



# स्वामी समर्थ साखर कारखाना गळीत हंगामाकरिता सज्ज : पाटील

✔ सुराज्य/अक्कलकोट

अक्कलकोट तालुक्यातील श्री स्वामी समर्थ सहकारी साखर कारखाना २०२२-२३ या गळीत हंगामाकरिता सज्ज झाले असून शेतकऱ्यांनी कारखान्याला ऊस देऊन सहकार्य करावेत असे आवाहन कारखान्याचे अध्यक्ष व माजी आमदार सिद्रामप्पा पाटील यांनी केले.


ते गुरुवारी तालुक्यातील तडवळ येथील याबाजी कॉम्प्लेक्स येथे पंचक्रोशीतील शेतकऱ्यांबरोबर विचार-विनिमय बैठकीच्यावेळी पाटील हे बोलत होते. दरम्यान माजी आमदार सिद्रामप्पा पाटील यांनी वेळोवेळी राज्य सरकार आणि सहकार विभागाकडे पाठपुरावा केला त्याला आता यश आले असून यंदाचा गळीत हंगाम सुरू करण्यासाठी कारखान्याची कामे युध्द पातळीवर सुरू आहेत. डिसेंबरमध्ये कारखाना गळीत हंगाम प्रारंभ होणार आहे.

याप्रसंगी पाटील यांनी एकंदरीत कारखान्याच्या धोरणाबाबत सविस्तर मार्गदर्शन केलं यंदाच्या गळीत हंगामात शेतकरी सभासदांनी कारखान्याला ऊस देऊन सहकार्य करावे जिल्ह्यातील इतर कारखान्याबरोबर दर देण्यास आपण कटिबध्द असल्याची ग्वाही पाटील यांनी दिली. याप्रसंगी सिध्देश्वर सहकार साखर कारखान्याचे संचालक काशिनाथ कोडते, सुरेश झळकी, माजी संचालक निलप्पा विजापुरे, अण्णाराव याबाजी, शिवसिध्द बुळ्ळा, सिध्दाप्पा गड्डी, भीमाशंकर विजापुरे, संजय याबाजी, आप्पासाहेब बिराजदार, रमेश कोटगी, स्वामी समर्थ सूतगिरणीचे संचालक बसवराज बाके, मल्लिकार्जुन धारसंगे, केगावचे चेअरमन कल्लप्पा हंगरगी, सुलेर जवळगे सोसायटीचे चेअरमन रविकांत बगले, भद्रशेन अरवत, माजी सरपंच धरेप्पा अरवत, शिवमुर्ती विजापुरे, अंबरनाथ विजापुरे, विवेक ईश्वरकट्टी यांच्यासह तडवळ भागातील विविध गावचे सरपंच, ग्रामपंचायत सदस्य, सोसायटीचे सदस्य, प्रतिष्ठित नेतेमंडळी उपस्थित होते.



## कुचन प्रशालेचा ७९ वा वर्धापन दिन उत्साहात साजरा

✔ सुराज्य/सोलापूर : शतकोत्तर यशस्वीपणे वाटचाल करणाऱ्या पद्मशाली शिक्षण संस्थेच्या कुचन प्रशाला या मातृशाखेने ७९ वर्षे पूर्ण करून ८० व्या वर्षात पदार्पण केले प्रशालेचा वर्धापन दिन मोठ्या उत्साहात व आनंदमय वातावरणात साजरा झाला. कुचन प्रशाला, कनिष्ठ महाविद्यालय व व्यवसाय शिक्षण विभागाचे प्राचार्य युवराज मेटे, उपप्राचार्य अनिल निंबाळकर, उपमुख्याध्यापक तुकाराम श्रीराम यांच्या शुभहस्ते पद्मशाली समाजाचे आद्य दैवत मार्कंडेय महामुनी व विद्यादेवता सरस्वतीच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. कुचन प्रशालेच्या सुंदर वस्तूच्या प्रवेशद्वारा जवळ तोरण बांधण्यात आले. तसेच रंगीत रांगोळया व मुलांनी केलेल्या आकाश दिव्यांची सजावट करण्यात आली होती. प्राचार्य युवराज मेटे यांनी कुचन प्रशालेच्या ७९ व्या वर्धापन दिनानिमित्त सर्वांना शुभेच्छा दिल्या. या प्रशालेने आजपर्यंत अनेक विद्यार्थ्यांना घडवले, बहुसंख्य विद्यार्थी विविध क्षेत्रात यशस्वी कामगिरी करत आहेत. यापुढेही येथे ज्ञानार्जन करून अनेक विद्यार्थ्यांनी प्रशालेचा नावलौकिक वाढवावा अशी अपेक्षा व्यक्त केली. या कार्यक्रमास पर्यवेक्षक जाहिदा जमादार, दत्तात्रेय मेरगू, मल्लिकार्जुन जोकारे व सर्व प्राध्यापकवृंद, शिक्षकवृंद, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थ्यांची उपस्थिती होती. प्रशालेच्या वर्धापन दिनानिमित्त सर्व उपस्थित विद्यार्थ्यांना चॉकलेटचे वाटप करण्यात आले.



## उत्कृष्ठ व्यवस्थापनामुळेच तीर्थक्षेत्राचा विकास : दानवे-पाटील

✔ सुराज्य/अक्कलकोट : श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळ (ट्रस्ट) हे अक्कलकोट तीर्थक्षेत्राच्या विकासाची उंची वाढविणारे न्यास असून मंडळाचे संस्थापक अध्यक्ष जन्मेजयराजे भोसले व त्यांचे पुत्र प्रमुख कार्यकारी विश्वस्त अमोलराजे भोसले यांच्या उत्कृष्ठ व्यवस्थापन व नियोजनामुळेच हे सर्व शक्य होत असल्याचे मनोगत केंद्रीय रेल्वे राज्य मंत्री ना. रावसाहेब दानवे-पाटील यांच्या सुविद्य पत्नी निर्मलाताई रावसाहेब दानवे-पाटील यांनी व्यक्त केल्या. त्या तीर्थक्षेत्र अक्कलकोट येथील श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळात सहकुटुंब आले असता न्यासाचे उपाध्यक्ष अभय खोबरे व सचिव शामराव मोरे यांच्या उपस्थितीत विश्वस्त भाऊ कापसे यांच्या हस्ते श्रींची प्रतिमा, कृपावस्त्र व श्रीफळ देऊन मंडळाच्या वतीने सत्कार करण्यात आला. यावेळी त्या बोलत होत्या. त्यांच्या समवेत त्यांच्या कन्या संजनाताई जाधव, नातू उषाताई आकात, शिवम पाटील, आशाताई माळी, अलकाताई गाडेकर, शोभाताई मातकर, केंद्रीय रेल्वे राज्य मंत्री ना. रावसाहेब दानवे-पाटील यांचे स्वीयसाहय्यक आत्माराम गव्हाणे, श्री क्षेत्र अक्कलकोटचे समर्थ नगरचे नाजी सरपंच प्रदीप पाटील, शिवशंकर स्वामी, सागर डिग्गे, समर्थ अल्लोळी, सागर याळवार हे उपस्थित होते.

## ऑनलाईन जैन पुनर्विवाह वधू-वर मेळावा

✔ सुराज्य/सोलापूर : भारतीय जैन संघटने मार्फत जैन समाजातील सर्व पंथियांसाठी (वर्चुअल) वधू- वर मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे. या मेळाव्यात विधवा, विधुर, घटस्फोटीत आणि विवाह इच्छुक अविवाहित युवक सहभागी होणार आहेत. हा मेळावा रविवार २० नोव्हेंबर रोजी झूम लिंक ऑनलाईन होणार आहे. इगड संघटनेचे संस्थापक शांतिलालज मुथ्था यांच्या प्रेरणेने व राष्ट्रीय अध्यक्ष राजेंद्र लुंकड, राष्ट्रीय संयोजक. अनिल रांका यांच्या प्रयत्नाने वर्चुअल वधू-वर मेळावा होत आहे. इच्छुक उमेदवारानी स्वतःचे प्रोफाईल तयार करून या संमेलनासाठी रेजिस्ट्रेशन करायचे आहे. नाव नोंदणीची शेवटची तारीख १४ नोव्हेंबर आहे. अधिक माहितीसाठी ९४४३३ ३८०६५, ८६६०७७ ७४१२ या नंबरशी संपर्क साधावा, असे आवाहन केतन शाह यांनी केले आहे

# चालक मालक यांनी नियमांचे पालन करावे : मांजरे

✔ सुराज्य/दक्षिण सोलापूर



दक्षिण सोलापूर तालुक्यातील भंडारकवठे येथील लोकमंगल को-जनरेशन साखर कारखाना गाळप हंगाम सुरू झाल्याने दक्षिण सोलापूर तालुक्यासह कर्नाटक मंगळवेढा मोहोळ या परिसरातील मोठ्या प्रमाणात ऊस लोकमंगल कारखान्याला येत आहे त्यामुळे अपघात प्रमाण वाढत असल्याने मंद्रुप पो. स्टे. हद्दीतील मौजे भंडारकवठे येथील लोकमंगल साखर कारखाना येथे बुधवार रोजी ऊस वाहतुक ट्रॅक्टर मालक - चालक यांना योग्य ते मार्गदर्शन करण्यात आले यावेळी सर्वांना काटकोर पणे अमलबजावणी करण्यास सांगितले अन्यथा कायदेशीर कारवाई करण्यात येईल अशी माहिती मंद्रुप पोलीस स्टेशनचे साहाय्यक पोलीस निरीक्षक रविंद्र मांजरे यांनी सांगितले. यावेळी रविंद्र माजरे यांनी पुढील नियमाचे पालन करण्यास सांगितले आहे ऊस तोडी ट्रॅक्टर चालक - मालक यांच्यासाठी सुचना दोन्ही ट्रेलर्स ना रेडीयम पट्टी तसेच रिफलेक्टर बोर्ड असावेत, वाहनांवर नंबर असावेत. ट्रॅक्टर - ट्रॉली यांचा मेंटनन्स केलेला असावा. चालत्या वाहनात टेप लावू नये, चालत्या वाहनात हेडफोन वापरू नयेत, वाहने उतारावरून घेऊन जाताना काळजी घ्यावी, वाहने उतारावर लावू नयेत. ट्रॅक्टर मधून उतरून जाताना ट्रॅक्टर वाहतूकीस अडथळा होणार नाही असे लाऊन ट्रॅक्टर बंद करून जावे. वाहने सावकाश चालवावे, ओव्हरटेक करू नये, रस्त्यात वाहने थांबवू नयेत. ऊस भरण्यासाठी वापरलेल्या दांड्या चांगल्या प्रतीच्या असाव्यात. जास्त ऊसाची खेप भरू नये, दारू पिऊन ट्रॅक्टर अजिबात चालवू नये वळणांवरून बरोबर अंदाज घेऊन वाहने चालवावीत, तीन चार मोकळ्या ट्रेलर्स जोडु नयेत

ट्रॅक्टर मध्ये डिझेल भरलेले असावे, डिझेल संपले म्हणून रस्त्यात ट्रॅक्टर थांबवण्याची वेळ येऊ नये, चिट बॉय, सुरक्षा रक्षक, शेतकी अधिकारी यांचे संपर्क क्रमांक ठेवावेत.

> लोकमंगल सह अनेक साखर कारखान्याचे गाळप हंगाम सुरू झाले आहे. दक्षिण तालुक्यातुन अनेक अनेक चालक मालक हे ऊस वाहतूक करीत आहेत अशा परिस्थितीत अनेक अपघात घडु नये. यासाठी मार्गदर्शन देण्यात आले. मनगोळी येथील ट्रॅक्टरची ट्रॉली पलटी होऊन पती पत्नी मृत्यू झाले आहे. अनेक चालक हे बे जबाबदारपणे वाहन चालवतात त्याचबरोबर अनेक ठिकाणी अशाप्रकारे अपघात होत आहेत. अपघाताचे प्रमाण कमी व्हावे चालक मालक या दोघांनीही काळजी पुर्वक वाहने चालवावे दिलेले मार्गदर्श तत्वांचे पालन करावे.
>
> – **रवींद्र मांजरे,** सहायक पोलिस निरीक्षक मंद्रूप

# महावितरणच्या अविश्रांत प्रयत्नांना यश

## १ हजार १३ विद्युत सहाय्यकांची नियुक्ती

✔ सुराज्य/सोलापूर : विद्युत सहाय्यक पदाच्या भरतीचा मार्ग मोकळा झाल्यानंतर महावितरणने मागील आठ दिवसात अविश्रांत परिश्रम घेत राज्यभरातील १ हजार १३ विद्युत सहाय्यकांना राज्यात विविध ठिकाणी आयोजित कार्यक्रमात नियुक्ती पत्रे देण्यात आली. बारामती परिमंडल मध्ये १४३ जणांची नियुक्ती करण्यात आली आहे.

मुंबई येथील यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान केंद्रात झालेल्या 'महासंकल्प' या कार्यक्रमात राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे व उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याहस्ते महावितरणच्या १० विद्युत सहाय्यकांना नियुक्ती पत्रे देऊन या संकल्पाचा शुभारंभ करण्यात आला. स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवी वर्षामध्ये ७५ हजार रोज़गार देण्याचा संकल्प राज्य शासनातर्फे राबविण्यात येत आहे. विभागीय आयुक्त कार्यालयात आयोजित 'महासंकल्प' या कार्यक्रमात उर्वरित सर्व विद्युत सहाय्यकांना नियुक्ती पत्रे देण्यात आली आहेत. कागदपत्रांची पडताळणी करून पात्र ठरलेल्या उमेदवारांमध्ये अकोला परिमंडल (५७) अमरावती परिमंडल (३८) औरंगाबाद परिमंडल (६२) बारामती परिमंडल (१४३) भांडुप परिमंडल (८३) चंद्रपूर परिमंडल (२२) गोंदिया परिमंडल (९) जळगाव परिमंडल (१०३) कोल्हापूर परिमंडल (१०४) कल्याण परिमंडल (७८) लातूर परिमंडल (७०) नागपूर परिमंडल (३७) नांदेड परिमंडल (३९) नाशिक परिमंडल (७६) पुणे परिमंडल (६०) आणि रत्नागिरी परिमंडल (३२) अशा एकूण एक हजार १३ उमेदवारांना विद्युत सहाय्यक या पदाची नियुक्ती पत्रे देण्यात आली.

महावितरणच्या विभागीय स्तरावर या विद्युत सहाय्यकांची पदस्थापना करण्यात आली असून त्यांना तांत्रिक कामाचे प्रशिक्षणही देण्यात येईल. महावितरणचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक विजय सिंघल यांच्या मार्गदर्शनाखाली संचालक प्रसाद रेशमे, कार्यकारी संचालक अरविंद भादीकर यांच्यासह मानव संसाधन विभागातील सर्व अधिकाऱ्यांनी मागील ८ दिवस अविश्रांत प्रयत्न करीत विद्युत सहाय्यकांना नियुक्ती पत्रे देण्याचा यशस्वी प्रयत्न केला.

## भारतवर्षीय दिगंबर जैन तीर्थसंरक्षणी उपाध्यक्षपदी अविनाश दोशी

✔ सुराज्य/नातेपुते : श्री भारतवर्षीय दिगंबर जैन तीर्थसंरक्षणी महासभेची पश्चिम महाराष्ट्र कार्यकारिणी नुकतीच जाहीर करण्यात आली. यामध्ये नातेपुते येथील अहिंसा सेवा समिती संस्थापक अध्यक्ष तथा नातेपुते नगरपंचायतीचे नगरसेवक अविनाश दोशी यांची पश्चिम महाराष्ट्र उपाध्यक्षपदी निवड करण्यात आली.

भारतवर्षीय दिगंबर जैन तीर्थसंरक्षणी महासभेच्या माध्यमातून स्वास्थ्य, सेवा, उच्च शिक्षण व स्वयंरोजगारासाठी मदत, जुन्या मंदिरांचा जीर्णोध्दार, सामूहिक विवाह, तीर्थक्षेत्र स्वच्छता मोहीम



राबवित समाजकार्य करणाऱ्या महासभेच्या कार्यकारणीच्या निवडी करण्यात आल्या. यावेळी श्री सन्मती सेवा दल बहुउद्देशीय अल्पसंख्याक संस्थेचे संस्थापक अध्यक्ष मिहीर गांधी, श्री भारतवर्षीय दिगंबर जैन तीर्थसंरक्षणी महासभा पश्चिम महाराष्ट्र अध्यक्ष नितीन गांधी फलटण, उपाध्यक्ष अविनाश दोशी नातेपुते मयूर गांधी अकलूज, डॉ. राजेश शहा म्हसवड, विपुल शहा बारामती, राहुल कोले वाळवा हाळभाग, चंद्रकांत वसवाडे, रूई ता. हातकणंगले, नितेश फडे अकलूज, अखिल दोशी मोडनिंब आदी उपस्थित होते. पश्चिम महाराष्ट्र उपाध्यक्षपदी अविनाश दोशी यांची निवड झाल्याबद्दल त्यांचा सत्कार नातेपुते येथे अहिंसा सेवा समितीच्या वतीने करण्यात आला. यावेळी राजेंद्र डूडू, महेश दावडा, महावीर दोशी, डॉ. तेजस चंकेश्वरा, अतुल दोशी आदीसह अन्य मान्यवर उपस्थित होते.

> समाजकार्याची आवड असल्याने समाज उपयोगी अनेक सामाजिक उपक्रम राबविले अनेक गरजूंना नेहमी मदतीचा हात देत आलो अनेक पदे भूषवली व प्रामाणिकपणे पार पाडली त्या कामाची पोचपावती म्हणूनच माझी भारतवर्षीय दिगंबर जैन तीर्थसंरक्षणी उपाध्यक्षपदी निवड करण्यात आली. माझ्यावर दिलेला विश्वासास मी पात्र राहुल ही जबाबदारी मी प्रामाणिकपणे पार पाडेन.
>
> – **अविनाश दोशी**
> भारतवर्षीय दिगंबर जैन तीर्थसंरक्षणी उपाध्यक्ष)

## चौगुले करणार कतार 'फिफा वर्ल्ड कप'चे मॅनेजमेंट

✔ सुराज्य/सांगोला

सांगोला येथील उत्तम चौगुले यांचे सुपुत्र आकाश चौगुले यांची कतार देशामध्ये होणाऱ्या फुटबॉल फिफा वर्ल्ड कप २०२२ साठी मॅनेजमेंट पदावर प्लॅनेट फूड या कंपनी कडून मॅनेजमेंट पदासाठी निवड करण्यात आली आहे. गुरूवारी ते कतार देशासाठी रवाना झाले.

आकाश चौगुले यांचे पहिली ते दहावीपर्यंत सह्याद्री इंग्लिश मीडियम स्कूल सांगोला येथे शिक्षण झाले



त्यानंतर अकरावी आणि बारावी न्यू इंग्लिश स्कूल सांगोला येथे शिक्षण घेतल्यानंतर पुढे पुणे येथे हॉटेल मॅनेजमेंट यु इ आय कोईमत्तूर हॉटेल मॅनेजमेंट कॉलेज पुणे येथे मॅनेजमेंटची डिग्री प्राप्त झाल्यानंतर या पदासाठी त्याची निवड झाली आहे. सांगोला शहरातील सर्व मित्र परिवारा मार्फत त्याचे अभिनंदन होत आहे

## अक्कलकोटचे विश्रामधाम गेल्या सहा महिन्यांपासून बंद

✔ सुराज्य/अक्कलकोट

रेल्वे स्टेशन रस्त्यावर असलेल्या सार्वजनिक बांधकाम विभागाचे विश्राम धाम गेल्या सहा महिन्यापासून बंद ठेवण्यात आलेले आहे. राज्यातल्या प्रमुख तीर्थक्षेत्रापैकी श्रीक्षेत्र अक्कलकोट असताना संबंधित विभागाचे याकडे दुर्लक्ष झाले असल्याने याचा फटका श्री स्वामी समर्थांच्या दर्शनासाठी आलेल्या अतिथींना बसल्याने तीव्र नाराजी व्यक्त केली जात आहे.

सार्वजनिक बांधकाम व जिल्हा परिषद बांधकाम खात्याच्या अखत्यारित अक्कलकोट शहरात दोन विश्रामधाम आहेत. दोन्हीची अवस्था कबाडखान्याची झालेली आहे. राज्य व केंद्र प्रशासकिय अधिकारी, आमदार,




खासदार, न्यायाधिश, अधिस्विकृती पत्रकार, आजी-माजी मंत्री यांच्याकरिता असलेले विश्रामधाम हे सध्या या दोन्हीही ठिकाणी गेटला कुलूप लावण्यात आलेले असून याबाबत संबंधित उपअभियंता यांनी विश्रामधाम मधील खानसाम व शिपाई हे सेवानिवृत्त झाल्याने आम्हाला बंद ठेवणे भाग पडले आहे.

राज्यातील मुख्य तीर्थक्षेत्रापैकी श्रीक्षेत्र अक्कलकोट असल्याने गेल्या दोन वर्षाखाली सार्वजनिक बांधकाम खात्याकडून रु. १० कोटी ३ कक्षाकरिता मंजूर झाले. याबाबतची निविदा देखील निघाली. हे सर्व गेल्या वर्षभरात घडलेले असताना अद्यापही संबंधित ठेकेदार हा काम करण्यास तयार नसल्याचे बांधकाम विभागाच्या सूत्रांनी सांगितले.

दिपावली सुट्टीनिमित्त श्रींच्या दर्शनाकरिता गेल्या आठ दिवसापूर्वी व आजही प्रचंड प्रमाणात गर्दी अक्कलकोटला असताना केवळ राहण्याची सोय नसल्याने प्रशासकिय उच्च अधिकारी, पदाधिकारी यांना अनेक अडचणींना सामोरे जावे लागले. अनेकजण विश्रामधाम स्थळी जावून देखील आले. मात्र बंद असल्याचे कळताच संताप व्यक्त केले.

# क्रीडांगणाच्या भाडे आकरणीला विविध क्रीडा संघटनांचा विरोध



## क्रीडा महासंघ आज आयुक्तांची भेट घेणार

✔ सुराज्य/सोलापूर

शहरातील व्हॉलीबॉल, कबड्डी, खो-खो मैदानांबरोबरच टेबल टेनिस हॉलसाठी भाडे आकारणी प्रस्ताव महापालिका प्रशासन आणू पाहत आहे. याला क्रीडा संघटनांनी विरोध केला आहे. या भाडे आकारणी प्रस्तावच्या विरोधात विविध संघटनांनी महापालिकेला निवेदन दिले

सोलापूर जिल्हा व्हॉलीबॉल संघटना, सोलापूर जिल्हा कबड्डी संघटना, सोलापूर जिल्हा टेबल टेनिस संघटना, याचप्रमाणे स्पोर्ट्स पॅव्हेलियनने निवेदन देऊन मैदानांसाठी कोणत्याही प्रकारची भाडे आकारणी करू नये, अशी मागणी केली आहे. व्हॉलीबॉल संघटनेचे उपाध्यक्ष प्रा. बाळासाहेब भास्कर, सहसचिव मिलिंद गोरटे, खजिनदार ॲड. प्रशांत कांबळे, स्पोर्ट्स पॅव्हेलियनचे अध्यक्ष प्रकाश भुतडा, कबड्डी संघटनेचे मरगु जाधव, टेबल टेनिस संघटनेचे झेड. एम. पुणेकर आदींच्या शिष्टमंडळाने महापालिका उपायुक्त तथा स्टेडियम कमिटीचे सचिव मच्छिंद्र घोलप यांच्याकडे निवेदन सादर केले.

महापालिका स्टेडियम कमिटीच्या शुक्रवारी होणाऱ्या बैठकीतील प्रस्तावित विषयांत भाडे आकारणीचा समावेश आहे.

# जन्म काँग्रेसमध्ये आणि शेवटही काँग्रेसमध्येच : आ.शिंदे

सुराज्य/सोलापूर

**आमचा जन्म काँग्रेसमध्ये झाला आणि शेवटही काँग्रेसमध्ये होणार आहे. भाजपचे लोक अफवा पसरवण्यात माहीर आहेत. त्यांच्याकडे सोलापुरात चांगले नेतृत्व नसल्यामुळे शिंदे कुटुंबीय भाजपमध्ये येणार अशी अफवा पसरत असल्याचे सांगत आमदार प्रणिती शिंदे यांनी भाजपमध्ये जाण्याच्या चर्चेला पूर्णविराम दिला.**

मध्यंतरी काही दिवसांपूर्वी आमदार प्रणिती शिंदे भाजपमध्ये जाऊन लोकसभा लढवणार अशी चर्चा होती. याबाबत पत्रकारांनी विचारले असता आमदार प्रणिती शिंदे म्हणाल्या की, शिंदे कुटुंबिय भाजपमध्ये जाणार ही अफवा भाजपचींच लोक पसरवत आहेत पण आमची सुरुवात काँग्रेसमध्ये झाली आणि शेवटही काँग्रेसमध्ये होणार आहे हे आमच्या पक्षातील लोकांनाही माहिती आणि सर्वसामान्य जनतेला ही माहिती आहे. त्यामुळे मला काहीही प्रूफ करण्याची गरज नाही असे सांगत त्यांनी भाजपमध्ये जाण्याच्या चर्चेला पूर्णविराम दिला. सोलापूर शहरात भाजपचे दोन आमदार आणि एक खासदार आहेत. पालिकेत भाजपची सत्ता आहे मात्र त्यांना काहीही शहराचा विकास करता आला नाही गेल्या निवडणुकीच्या दरम्यान रोज पाहण्यापूर्वी पुरवठा करण्याचे आश्वासन दिले होते मात्र अद्यापही चार



ते पाच दिवस पाणीपुरवठा होत आहे शहर आणि जिल्ह्यात कोणतेही नवीन व्यवसाय आले नाहीत त्यामुळेच आगामी काळात कोण उमेदवार लोकसभेला द्यायचा हा प्रश्न त्यांच्यासमोर आहे त्यामुळेच शिंदे कुटुंबीय भाजपमध्ये प्रवेश करणार असल्याचा अफवा त्यांच्याकडून पसरवल्या जात असल्याचे त्यांनी सांगितले.

## ■ भिडे यांच्यावर केली टीका



तू अगोदर कंकू लाव, त्यानंतरच मी तुझ्याशी बोलेन' असे विधान करणारे संभाजी भिडे यांचा काँग्रेसच्या प्रदेश कार्याध्यक्षा तथा आमदार प्रणिती शिंदे यांनी शेलक्या शब्दांत समाचार घेतला. महिलेने काय घालवं आणि कसं वागावं,' हे त्यांनी आम्हाला सांगू नये, अशी टीका त्यांनी भिडे यांच्यावर केली आहे. संभाजी भिडे आणि भाजप विचारांची लोकं आहेत. प्रत्येक महिलेला एक वस्तू म्हणून बघितलं जात आहे. त्या महिलेने काय घालावं, तिने कसं वागावं, हे या लोकांनी आम्हाला हे सांगू नये. आम्हाला आमची संस्कृती आणि देशप्रेम हे हृदयात आहे. ते आम्हाला दाखविण्याची गरज नाही. तुम्ही महिलांचे काम आणि कर्तृत्व बघत नाही. फक्त चेहऱ्यावर जाता आणि त्यांना ऑब्जेक्टिफाय करता आणि त्यांच्यावर अत्याचार करता, असे सांगून आमदार प्रणिती शिंदे यांनी भिडे यांचा निषेध व्यक्त केला.

## देव दर्शनाला गेल्यावर चोरट्याने फोडले घर

सुराज्य/सोलापूर

कुटुंबासह देव दर्शनाला गेल्यावर अज्ञात चोरट्याने घराचे कुलूप तोडून चाळीस हजार रुपये रोख रक्कम चोरून नेल्याची घटना दि.२७ ऑक्टोंबर २०२२ ते २ नोव्हेंबर २०२२ दरम्यान प्रज्ञा कामगार नगर देसाई नगर जवळ घडली.याप्रकरणी श्रीनिवास इरण्णा बंडा (वय-४२,रा.प्रज्ञा कामगार नगर) यांनी एमआयडीसी पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे.त्यांच्या फिर्यादीवरून अज्ञात चोरट्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे.

फिर्यादी हे कुटुंबासह देवदर्शनासाठी तिरुपती येथे गेले होते.त्यावेळी कोणीतरी अज्ञात चोरट्याने घराच्या दरवाजाचे कुलूप तोडून घरात प्रवेश केला.त्यानंतर घरातील चाळीस हजार रुपये रोख रक्कम चोरून नेली आहे.असे फिर्यादीत नमूद आहे.घटनेचा पुढील तपास पोलीस हेड कॉन्स्टेबल पाटील हे करीत आहेत.

## उपमुख्यमंत्र्यांनी केले कोर्टी ते वाखरी रस्त्याचे भूमिपूजन

सुराज्य/सोलापूर

येथील कोर्टी (कराड चौक) ते वाखरी (बाह्य वळण रस्ता) या रस्त्याचे भूमिपूजन उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते कुदळ मारून गुरूवारी करण्यात आले.

यावेळी महसूलमंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील, खासदार रणजितसिंह नाईक निंबाळकर, आमदार सर्वश्री समाधान आवताडे, रणजितसिंह मोहिते पाटील, राम सातपुते, माजी आमदार प्रशांत परिचारक, विभागीय आयुक्त सौरभ राव, जिल्हाधिकारी मिलिंद शंभरकर, मुख्य कार्यकारी अधिकारी दिलीप स्वामी, मुख्य अभियंता अतुल चव्हाण, प्रांत अधिकारी गजानन गुरव, कार्यकारी अभियंता दत्तात्रय गावडे आदी उपस्थित होते. यावेळी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते या परिसरात वृक्षारोपण करण्यात



आले. श्री क्षेत्र देहू आळंदी पंढरपूर नेवासा पालखीतळ मार्ग विकास आराखडा अंतर्गत पंढरपूर येथील कोर्टी ते वाखरी या ३ किलोमीटर रस्त्याच्या सुधारणा कामासाठी रुपये १५ कोटी २७ लक्ष निधीची तरतूद करण्यात आली आहे. याचा कार्यारंभ आदेश १४ सप्टेंबर २०२२ रोजी काढण्यात आला आहे. या रस्ता कामासाठी एकूण ३५,९२३.३७ चौ. मी. क्षेत्र भूसंपादित करण्यात आले आहे. यामध्ये खाजगी क्षेत्र २०५५३.८८ चौ. मी. व शासकीय क्षेत्र १४७४९.४९ चौ मी. संपादित केले आहे. या कामामध्ये भरावकाम, जी.एस.बी. काम, डब्ल्यू. एम. एम. काम, डी. बी., दोन पुलमोऱ्या बांधणे, रोड जंक्शन सुधारणा करणे, रोड साइड फर्नीचर करणे, गटार काढणे आदि कामांचा समावेश आहे. कामासाठी जागेचे भूसंपादन पूर्ण झाले असून संपादित जागा शासनाच्या ताब्यात आहे. पंढरपूर शहरामध्ये सद्यस्थितीत अनवली, कासेगाव, मंगळवेढा, सांगोला, टाकळी व कराड रस्ता येथून येणारी वाहतूक ही बाह्यमार्गाद्वारे जाणे आवश्यक असल्याने सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत बाह्यवळण रस्ता पंढरपूर शहरालगत करण्यात आला आहे. रस्त्यावरून येणारी वाहतूक पंढरपूर नगरपरिषद हद्दीतून व उपनगरातून जात आहे. या रस्त्यावरील जड वाहतुकीमुळे पंढरपूर शहरात वाहतूक कोंडी होत असून अपघातांचे प्रमाण वाढले आहे. या पार्श्वभूमिवर कोर्टी वाखरी रस्ता पर्यायी बाह्यवळण रस्ता म्हणून वापरला जाणार आहे. वारकरी भाविकांना अधिकच्या सेवा उपलब्ध होण्यासाठी बाह्यवळण रस्त्याचा उपयोग होणार आहे.

## कार्तिकीसाठी चार लाख भाविक पंढरीत दाखल

**पंढरपूर** : कार्तिकी एकादशीचा सोहळा शुक्रवारी साजरा होत असून यासाठी पंढरपूरमध्ये सुमारे चार लाख भाविक दाखल झाले असावेत, असा अंदाज आहे. दरम्यान पहाटे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हे सपत्नीक श्री विठ्ठल रखुमाईची शासकिय महापूजा करणार आहेत.कार्तिकीच्या या सोहळ्यामुळे पंढरीनगरी विठुनामाच्या गजराने दुमदुमली आहे. विविध दिंड्यांसमवेत चालत येणारे भाविक आता पंढरीत दाखल झाले आहेत. याचबरोबर एसटी बसेस, खासगी वाहनं व रेल्वेच्या माध्यमातून लाखो वारकरी येथे आले आहेत. चंद्रभागा वाळवंटात स्नानासाठी गर्दी आहे. श्री विठ्ठलच्या दर्शनासाठी रांगेत हजारो भक्त उभे असून रांग पत्राशेडमध्ये होती. मंदिर समिती व प्रशासनाच्यावतीने अनेक सोयी सुविधा पुरविण्यात आल्या आहेत.

## यश करजगी यांच्या वाढदिवसानिमित्त रक्तदान शिबिर

**सोलापूर** : नागेश करजगी फाउंडेशन व एन के किड्स स्कूल बाळे यांच्या विद्यमाने यश करजगी यांच्या वाढदिवसानिम्मित शुक्रवारी भव्य रक्तदान शिबिराचे आयोजन बाळे येथे करण्यात आले असल्याचे फाऊंडेशन चे अध्यक्ष बंडोपंत पाटील यांनी सांगितले. हे शिबिर शुक्रवार दि ४ नोहेंबर रोजी सकाळी ९ वाजता बाळे येथील बार्शी रोड वरील करजगी निवास येथे संपन्न होणार आहे शिबिराचे उदघाटन उदोजक कुमार दादा करजगी व ब्लड बँक चेअरमन विजयकुमार हत्तुरे यांच्या हस्ते होणार आहे. तरी या शिबिरात जास्तीत जास्त रक्तदात्यांनी रक्तदान करावे असे आवाहन दोन्हीही संस्थेच्या वतीने करण्यात आले आहे

## किरण लोहार यांच्या जामिनावर आज होणार सुनावणी

**सोलापूर** : लाच घेतल्याप्रकरणी अटकेत असलेले जिल्हा परिषद प्राथमिक विभागाचे शिक्षणाधिकारी किरण लोहार यांना गुरुवारी न्यायालयात हजर केले होते.यावेळी पोलिसांनी त्यांना तपासाकरिता तीन दिवसाची पोलीस कोठडी मागितली असता न्यायालयाने ती फेटाळून लावत त्यांची रवानगी न्यायालयीन कोठडीत करण्यात आली आहे.दरम्यान शुक्रवारी त्यांच्या जामीन अर्जावर सुनामी होणार आहे. लोहार तर्फे ॲड.मिलिंद थोबडे,ॲड. विनोद सूर्यवंशी यांनी तर सरकारी वकील म्हणून ॲड. गंगाधर रामपुरे यांनी काम पाहिले.

## वाढीव बांधकाम केलेल्यांना नोटीसा देण्यास सुरूवात

**सोलापूर** : महापालिका प्रशासनाकडून सोलापूर शहर आणि हद्दवाढ भागातील मिळकतींवरील वाढीव बांधकामाची माहिती संकलित करण्यात आली आहे. या वाढीव बांधकामानुसार मिळकत कराची आकारणी केली जाणार आहे. अशा मिळकतदारांना टप्प्याटप्प्याने सुनावणीसाठी नोटीसा बजावण्यास गुरूवारपासून सुरूवात करण्यात आली आहे. शहर आणि हद्दवाढ भागातील अनेक मिळकतदारांना यापूर्वी महापालिका प्रशासन आणि मालमत्ता कर विभागाकडून महापालिकेकडे असलेल्या संकलित नव्या डाटानुसार वाढीव कराच्या नोटिसा बजावण्यात आल्या होत्या. त्या कार्यवाहीला मिळकतदारांसह लोकप्रतिनिधींकडून जोरदार विरोध करण्यात आला होता. यामुळे महापालिका प्रशासनाला काढण्यात



आलेल्या त्या हजारो नोटिसा रद्द कराव्या लागल्या होत्या. दरम्यान, पुन्हा एकदा महापालिकेने नव्याने मिळकत कर रिविजन प्रमाणे तसेच मिळकतीतील वाढीव बांधकाम क्षेत्र (बिल्टप एरिया) प्रमाणे कर वसुली करण्याच्या प्रक्रियेला सुरुवात केली. शहर आणि हद्दवाढ भागात यापूर्वी महापालिकेने नेमलेल्या सायबरटेक आणि यानंतर उर्वरित मिळकतींचे महापालिका विशेष पथकाकडून करण्यात आलेल्या सर्व्हेनंतर याचा मालमत्ता कर विभागाकडे सविस्तर डाटा तयार आहे. या डाटा नुसार ज्या मिळकतदारांनी वाढीव बांधकाम केले आहे. त्यांना त्यांच्या वाढीव बांधकामाचे ठरलेल्या दरानुसार वाढीव कर आकारण्यात येणार आहे. तसेच ज्या मिळकतीमधील वापर बदल आणि क्षेत्र बदलाप्रमाणे बांधकामे झाली आहेत अशा मिळकतदारांकडून देखील वाढीव बांधकामानुसार वाढीव मालमत्ता कर वसूल केला जाणार आहे. त्या मिळकत दारांचा सर्व्हेपूर्ण झाला असून त्यांना ५ टक्के वाढीव कराच्या नोटिसा टप्प्याटप्प्याने बजावण्यास सुरूवात करण्यात आली आहे.

## देगाव येथे दुचाकी चालक ठार; मोटर चालकाविरुद्ध गुन्हा

सुराज्य/सोलापूर

पंढरपूर ते मोहोळ रस्त्यावरील देगाव जवळ बुधवारी झालेल्या अपघात प्रकरणात पंढरपूर तालुक्याच्या पोलिसांनी एमएच०८-आर-८७४३ या मोटारीचा चालक युनुस निजाम तांबोळी (रा.वाळवा जि.सांगली) याच्याविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.





काल सायंकाळच्या सुमारास युनुस तांबोळी याच्या मोटारीच्या धडकेने दुचाकी वरील दादाराव बळीराम दुधाळ (वय ४६ रा.वडजी ता.दक्षिण सोलापूर) हे गंभीर जखमी होऊन मयत झाले होते. या घटनेची फिर्याद त्यांचे भाऊ सत्यवान दुधाळ यांनी पोलिसात दाखल केली होती. हवालदार चवरे पुढील तपास करीत आहेत.

### मंगळवेढा येथे घरफोडी ६३ हजाराचे दागिने पळविले

**सोलापूर** : मंगळवेढा येथील तुकाई नगरात राहणाऱ्या प्रशांत विठ्ठल एकतपुरे यांच्या बंद घराचे कुलूप तोडून चोरट्याने कपाटातील ६३ हजार किमतीचे १८ ग्रॅम सोन्याचे दागिने पळविले. ते २२ ऑक्टोबर रोजी घराला कुलूप लावून वेळापूर येथे गेले होते. मंगळवारी परतल्यानंतर त्यांना घरात चोरी झाल्याचे दिसून आले. त्याप्रमाणे त्यांनी मंगळवेढा पोलिसात फिर्याद दाखल केली.

### दीड वर्षाच्या मुलीचे अपहरण

**सोलापूर** : भिक्षा मागणाऱ्या महिलेच्या एका दीड वर्षाच्या मुलीला अज्ञात इसमाने पळवून नेल्याची घटना दि.१ नोव्हेंबर रोजी रात्री एक वाजण्याच्या सुमारास सोलापुरात घडली.याप्रकरणी पीडित मुलीच्या आईने एमआयडीसी पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली असून, त्यांच्या फिर्यादीवरून अज्ञात इसमाविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे.पुढील तपास पोलीस करीत आहेत.

## लाच घेणाऱ्या महिला लेखा लिपीक बडवणे यांना पोलीस कोठडी

**सोलापूर** : कोषागार कार्यालयातील महिला लेखा लिपिक अश्विनी देविदास बडवणे यांना लाच घेताना लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने सापळा रचून बुधवारी सायंकाळी अटक केली होती.गुरुवारी दुपारी त्यांना न्यायालयात हजर केले असता जिल्हा व सत्र न्यायाधीश पांढरे यांनी त्यांना दोन दिवसाची पोलीस कोठडी सुनावली.

तक्रारदाराचे वडिल पोलिस खात्यात वरिष्ठ पोलीस निरीक्षक पदावर कार्यरत होते.आपल्या वडिलांच्या फॅमिली पेन्शन करिता तक्रारदाराने कोषागार कार्यालयात अर्ज केला होता. फॅमिली पेन्शनची फाईल पुढे सरकविण्यासाठी तेथील महिला लेखा लिपीक देविदास बडवणे यांनी तक्रार दाराकडे लाच मागितली. तक्रारदाराकडून उरलेले साडेचार हजार रुपये रोख लाच स्वीकारताना बडवणे यांना लुचपत विभागाने रंगेहात पकडले होते. यात आरोपी बडवणे यांच्यातर्फे ॲड.निलेश जोशी तर सरकारी वकिल म्हणून ॲड. शितल डोके यांनी काम पाहिले.

## महानगरपालिका मंडई विभागाचा १.१ कोटी रुपये वसुलीचा धुमधडाका

**मागील वर्षीच्या तुलनेत यंदा साडेनऊ लाखांची अधिक वसुली**

**सोलापूर** : महापालिका मंडई विभागाने एप्रिल ते ऑक्टोबर २०२२ या सात महिन्यात विविध भाड्यापोटी १.१ कोटी रुपये वसुलीचा धुमधडाका केला आहे. मागील आर्थिक वर्षीच्या तुलनेत या सात महिन्यात एकूण ९ लाख ५१ हजाराची अधिक वसुली केल्याचे दिसून येते.

सोलापूर महापालिका मंडई विभागाच्या वतीने विविध मंडई मधील गाळे व ओटे भाडे व दैनिक भाडे वसुली जोरात सुरू आहे. मागील सन २०२१-२२ या आर्थिक वर्षात एप्रिल ते ऑक्टोबर अखेर ९२ लाख १३ हजार ९३७ इतकी गाळे व ओटे भाडे व दैनिक भाडे वसुली झाली होती तर सन २०२२ -२३ या चालू आर्थिक वर्षात एप्रिल ते ऑक्टोबर अखेर १ कोटी १ लाख ६५ हजार ३९ रुपये इतकी वसुली करण्यात यश आले आहे. मागील वर्षाच्या तुलनेत या सात महिन्यात एकूण ९ लाख ५१ हजार १०२ रुपये ज्यादा वसुली करण्यात आली आहे. महापालिका आयुक्त पी. शिवशंकर यांच्या आदेशानुसार उपायुक्त विद्या पोळ, नियंत्रण अधिकारी तथा सहायक आयुक्त विक्रम पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली ही वसुली मोहीम अखंडितपणे सुरू असल्याचे महापालिका मंडई विभागाचे प्रमुख जगन्नाथ बनसोडे यांनी सांगितले.

### अशी आहे दरमहा मंडई विभागाची वसुली

एप्रिल २०२२ मध्ये १८ लाख ३१ हजार २२५ रुपये वसुली करण्यात आली. पुढे माहे मे - १३ लाख ८ हजार ६५५, जून - १८ लाख २७ हजार ८३, जुलै - १३ लाख ५६ हजार ८९३, ऑगस्ट - १३ लाख १२ हजार २६५, सप्टेंबर - १४ लाख ८९ हजार ५४३, ऑक्टोबर - १० लाख ३० हजार ३७५ असे एकूण या सात महिन्यात १ कोटी १ लाख ६५ हजार ३९ रुपये वसुली करण्यात आली आहे,अशी माहिती मंडई विभागाचे प्रमुख जगन्नाथ बनसोडे यांनी दिली.

## विकास आणि नवनिर्माणाची वाटचाल : आ.राजाभाऊ राऊत

राज्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस बार्शी शहरात विविध विकास कामांच्या उद्घाटनासाठी आज येत आहेत. त्यांच्या हस्ते भुयारी गटार योजना लोकार्पण सोहळा तसेच सोयाबिन प्रक्रिया उद्योगाचे उद्घाटन होत आहे. देवेंद्र फडणवीस यांचे सातत्याने बार्शी तालुक्याच्या प्रलंबित प्रश्नांवर लक्ष आहे. आमदार राजाभाउ राउत यांच्या माध्यमातून फडणवीस यांनी तालुक्याला वेळोवळी विकास निधी दिला आहे. आमदार राजाभाउ राउत यांनी भारतीय जनता पार्टीमध्ये प्रवेश केल्यापासून निष्ठेने पक्षकार्य करत बार्शी तालुक्याचे सिंचनाचे, उद्योगाचे, पायाभुत सुविधांचे प्रश्न मांडले आहेत. बार्शी शहर हे धार्मिक वारसा लाभलेले आहेत. या शहरात अखिल भारतामध्ये एकमेव भगवान श्री महाविष्णुचे भगवंत मंदिर आहे. त्यामुळे या शहराला असलेला पुरातण वारसा लक्षात घेवुन तिर्थक्षेत्र विकास निधी मिळावा यासाठी आमदार राउत यांचा पाठपुरावा आहे.



बार्शी तालुका उपसा सिंचन योजना पुर्णात्वाला गेल्यानंतर साडे बारा हजार हेक्टर जमीन ओलीताखाली येणार आहे. त्यामुळे तालुक्यात हरितक्रांती घडणार आहे व हा तालुका सुजलाम सुफलाम होणार आहे त्यामुळे हि योजना लवकर पुर्णत्वाला जाण्यासाठी आमदार राउत भगीरथ प्रयत्न करत आहेत. तसेच आज तरूण पिढीच्या बेरोजगारीचा प्रश्न महत्वाचा आहे. तालुक्यामध्ये अनेक होतकरू तरूणांना आपले उद्योग व कारखाने उभारण्यासाठी एम.आय.डी.सी.चे छत्र लाभणे गरजेचे आहे. त्यामुळे शहरातील १३५ एकर जमीनीबरोबरच ६०० एकर मध्ये एम.आय.डी.सी. कार्यान्वित होणे व नवे उद्योजक होणे काळाची गरज आहे. त्यामुळे एम.आय. डी.सी. कार्यान्वित होऊन उद्योगक्रांती घडण्यासाठी आमदार राउत आग्रही आहेत. तालुक्यात वेगवेगळ्या उद्योग व्यवसाय कारखानदारीला प्रोत्साहन देण्याचेच आमदार राउत यांचे धोरण आहे. त्यामुळेच दिलीप व शितल गांधी यांच्या सोयाबिन प्रक्रिया उद्योगाच्या निर्मितीलाही त्यांनी प्रोत्साहन दिले आहे. विविध उद्योगांच्या माध्यमातून तालुक्यातील उलाढाल वाढली पाहिजे व बाजार पेठ सक्षम झाली पाहिजे यासाठी ते प्रयत्न करत आहेत. बार्शी शहरात नगरपालिकेच्या सत्तेचे आमदार राउत हे गेली ५ वर्षे मार्गदर्शक होते. त्यांनी शहराच्या विकासाचा नियोजनबध्द आराखडा तयार करून मुलभुत प्रश्न सोडविण्यासाठी शासनदरबारी प्रकल्प मांडले. त्यांनतर देवेंद्र फडणवीस मुख्यमंत्री असताना भुयारी गटार योजनेला मंजूरी मिळाली त्यामुळे बार्शी शहराचे सार्वजनिक आरोग्य व मलनिस्सारणबाबत आधुनिक व बंदिस्त गटारींच्या माध्यमातून सोय होणार आहे.

आमदार राऊत यांनी फडणवीस यांच्याकडे पाठपुरावा करून तालुक्यातील सार्वजनिक रस्ते, उपजिल्हा रूग्णालय मंजूरी नविन बसस्थानकाच्या विस्तारीकरणाचा आराखडा मांडला आहे. आमदार राउत यांचे नेतृत्व लोकचळवळीतून निर्माण झालेले आहे. त्यांनी नगरसेवक, नगराध्यक्ष ते दोन वेळा आमदार असा प्रवास केला आहे. तालुक्याच्या राजकारणात ते गेली तीन दशके सक्रिय आहेत. त्यांनी दोन वेळा आपल्या मार्गदर्शनाखाली नगरपालिकेची सत्ता ताब्यात घेत शहराचा सर्वांगिण विकास केला आहे. तालुका पंचायत समितीवीर त्यांनी ५ वेळा अधिराज्य गाजवले आहेत. ग्रामीण भागाच्या विकासाला वळण दिले आहे. बार्शीची उच्चत्तम कृषी उत्पन्न बाजार समिती ही आमदार राउत यांच्या नेतृत्वाखाली कार्यरत आहे. त्यांचे पुत्र व युवा सभापती रणवीर राउत यांनी बाजार समितीचा कायापालट घडविला आहे. बाजार समितीच्या माध्यमातून शेतकऱ्यांना चांगला भाव मिळत आहे. तर व्यापारी प्रगतीपथावर आहेत. उपमुख्यमंत्री दवेंद्र फडणवीस हे आमदार राउत यांना पाठबळ देत तालुक्याच्या सर्वांगिण विकासासाठी मोठा विकास निधी मंजूर करतील अशी सर्व बार्शीकरांना अपेक्षा व खात्री आहे.

— सचिन अपसिंगकर, बार्शी





## प्रभाग क्र.१५ मध्ये भारत जोडो यात्रा नोंदणीस सुरूवात

सुराज्य/सोलापूर

प्रभाग क्र.१५ मध्ये आ. प्रणिती शिंदे यांच्या प्रमुख उपस्थितीत भारत जोडो यात्रा मध्ये अकोला येथे सहभागी होणाऱ्या पदयात्री सदस्यांची नोंदणीची सुरुवात करण्यात आली आहे. या यात्रेत प्रभागातील जवळपास ५०० ते ७०० पदयात्री सहभागी होणार असल्याचे नगरसेवक चेतन नरोटे , विनोद भोसले यांनी सांगितले

खा. राहुल गांधी यांच्या नेतृत्वाखाली भारत जोडो ही पदयात्रा महाराष्ट्रामधे ७ नोव्हेंबर रोजी येणार आहे. जवळपास १४ दिवस महाराष्ट्रामधे ही पदयात्रा असणार आहे. १७ रोजी सोलापूर शहर जिल्ह्याच्यावतीने अकोला येथे यात्रेचे स्वागत करण्यात येणार आहे.

या यात्रेला जाण्यासाठी सदस्य नोंदणी सुरू करण्यात आल्याचे भोसले यांनी सांगितले. यावेळी नगरसेवक चेतन नरोटे, विनोद भोसले, जिल्हा काँग्रेस अनु.जाती विभाचे जिल्हाध्यक्ष. मयुर खरात, शाहु सलगर, बसु कोळी, अमोल भोसले, संभाजी खांडेकर, नितीश पावर, अतिन चवरे,दत्ता कोली, करण माशाळ, अमित राठोड, शशांक दांडगे, प्रवीन सावंत, सुमित जाधव, अभिषेक म्हमाणे,बाळासाहेब कोळी, श्रीकांत गायकवाड, अमोल पाटोळे, बालाजी कोळी,साई कोळी,दिग्विजय सलगर, समर्थ भोसले, महादेव गायकवाड, अजिंक्य गायकवाड, प्रीतम कोळेकर, आकाश सलगर उपस्थित होते.